# ब्रह्मर्षी सत्यकाम

विजय ग. वाटाणे

# ब्रह्मर्षी सत्यकाम

(भाऊजी दप्तरी यांचे जीवनावरील नाटक)

लेखक

विजय ग. वाटाणे

नागपूर

कौस्तुभ प्रकाशन

नागपूर २२

❋ प्रकाशकः-
शैलेश देशपांडे
कौस्तुभ प्रकाशन
२९/अ नवनिर्माण सोसायटी
राणा प्रतापनगर
नागपूर-२२

❋ मुद्रकः-
सायली ऑफसेट
गांधीबाग,
नागपूर

❋ प्रथमावृत्ती :
जुलै २०००

❋ मुखपृष्ठ संकल्पना
शैलेश देशपांडे

किंमत ४०/- ISBN NO : 81-86949-35-6

*माझे आजोबा*

*कै. भाऊजी दप्तरी*

*यांना अर्पण*

**– विजय**

# शुभेच्छा

आजच्या काळात विद्वद्रत्न भाऊजी दप्तरी यांचे जीवन आणि कर्तृत्व हा विषय एखाद्या लेखकाला नाट्यकृतीसाठी निवडावा वाटणे ही घटनाच मुळात मला महत्त्वाची वाटते. कारण असे की, भाऊजी दप्तरी यांनी हाती घेतलेले ज्योतिर्गणित, बुद्धिप्रामाण्यता, धर्मसुधारणा आदी विषय, त्या विषयांचा त्यांनी केलेला व्यासंग आणि चिकित्सक बुद्धीने अशा विषयांवर केलेले ग्रंथलेखन त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेचा आवाका दाखविणारे असले, तरी त्यासाठी आयुष्यभर केलेली उठाठेव 'लोकप्रिय' या सदरात मोडणारी नाही. ती तशी नसल्यामुळे एखादा नाटककार नाट्यलेखनासाठी तिकडे न वळणेच स्वाभाविक ठरते. हां, भाऊजी दप्तरी हा चरित्रात्म कादंबरीचा विषय निश्चितच ठरू शकतो. परंतु त्यांच्या जीवनावर नाटक बेतण्याचा विचार क्वचितच कुणाच्या मनामध्ये आला असता. नागपूरचे सुप्रसिद्ध लेखक श्री. विजय वाटाणे अशा अपवादभूत लेखकांपैकी म्हणावे लागतील. 'ब्रह्मर्षी सत्यकाम' यी शीर्षकाखाली त्यांनी भाऊजी दप्तरींच्या जीवनावर चक्क दोन अंकी नाटक लिहिले आहे. लेखक श्री. वाटाणे हे भाऊजींचे नातू आहेत व त्यामुळे त्यांनी नाट्यकृतीसाठी दप्तरी या विषयाला हात घातला हे क्षणभर मान्य केले तरी, वरील वस्तुस्थितीत फरक पडत नाही.

ज्योतिर्गणित, वैदिक वाङ्मय, वेदान्त तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र हे भाऊजींच्या संशोधनाचे, विचिकित्सेचे विषय होते. होमिओपॅथीचाही त्यांचा दांडगा अभ्यास होता. टिळकांसारखीच कुशाग्र बुद्धी त्यांना लाभली होती. स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या काळात असहकाराच्या चळवलीमध्ये उडी घेऊन त्यांनी कारावासही भोगला होता. ज्योतिर्गणितात विलक्षण गती असलेले टिळक देशासाठी राजकारणात पडले; भाऊजींनी मात्र व्यासंग आणि ग्रंथरचना यांची कास सोडली नाही. भाऊजींना 'आधुनिक भास्कराचार्य' म्हणून संबोधले जाई ते उगाच नव्हे.

जून वाटावेत असे जरी वरील सर्व विषय असले तरी स्वतः भाऊजी सुधारणावादी आणि प्रखर असे बुद्धिप्रामाण्यवादी होते. त्यांनी केलेली धर्मचिकित्सा हे त्याचेच द्योतक होय. धर्मचिकित्सा करूनच केवळ ते थांबले नाहीत तर भारतीय परंपरेनुसार नागपुरात त्यांनी धर्म-निर्णय मंडळ चालवून धार्मिक विधींमधील अवडंबर काढून टाकण्याची कृतिशील खटपटही केली. वैदिक वाङ्मयाचा अचूक अर्थ लावून

सनातन वैदिक धर्म हा लौकिकतावादी कसा आहे तेही भाऊजींनी पुराव्यासह सिद्ध करून दाखविले. वैदिक धर्मात स्पृश्यास्पृश्यता नाही हे सांगण्यासाठी करवीर पीठाच्या श्रीशंकराचार्यांशी जाहीर सभेत हुज्जत घालण्यासही त्यांनी कमी केले नाही. 'धर्मरहस्य' हा त्यांचा ग्रंथ म्हणजे तर 'केशव' प्रणीत नवी स्मृतीच होय असे म्हटले गेले आहे.

गुंतागुंतीच्या विषयांची बुद्धीच्या कसोटीच्या आधारे मांडणी करणारे विचारवंत, मूलगामी संशोधक, प्रज्ञावंत अशा वर्गात बसणारी मंडळी व्यावहारिक जीवनात विचित्र, विक्षिप्त इत्यादी सामाजिक सन्मानांचे हक्कदार ठरत असतात. आपण जोपासलेल्या विचारांसाठी प्रसंगी पडेल ती किंमत चुकविण्याचीही त्यांची तयारी असते. भाऊजी दप्तरीही त्याला अपवाद नव्हते.

भाऊजींच्या जीवितकार्याचे नाट्यीकरण करताना श्री. विजय वाटाणे यांनी वरील सर्व गोष्टींचे भान तर ठेवले आहेच, शिवाय आपली नाट्यसंहिता प्रयोगक्षम होईल, याचीही दक्षता घेतली आहे. त्याबद्दल त्यांचे वेगळे अभिनंदन केले पाहिजे.

१९८० हे भाऊजींच्या जन्मशताब्दीचे वर्ष. त्या वर्षात ही नाट्यकृती प्रकाशात येऊ शकली नाही; कदाचित त्यावेळी तसा योग नव्हता. नागपूरच्याच कौस्तुभ प्रकाशनामुळे जन्मशताब्दीनंतरच्या दुसऱ्या दशकात तो जुळून आला. त्यासाठी या ठिकाणी प्रकाशकांचे कौतुक तर केलेच पाहिजे, पण त्यासोबत त्यांचे अभिनंदनही केले पाहिजे. नाटक भाऊजी दप्तरींवर जरी असले, तरी ते 'ब्रह्मर्षी सत्यकाम' अशा वेगळ्या नावाने प्रकाशित होत आहे. प्रथमदर्शनी तरी या शीर्षकामुळे प्रस्तुत नाटक भाऊजी दप्तरींच्या जीवनावर आहे असा बोध होत नाही. तसे न होण्यात असलेला व्यावसायिक धोका पत्करूनही प्रकाशकांनी मूळ नाट्यसंहिता पुस्तकरूपात आणली. त्याहीमुळे प्रकाशकांचे अभिनंदन केले पाहिजे.

या नाटकामुळे, लेखकाला अपेक्षित असल्यामुळे, भाऊजींसंबंधीचे समज-गैरसमज दूर होण्यास हातभार लागेल असा विश्वास वाटतो. लेखकाला माझ्या शुभेच्छा.

**गुरुपौर्णिमा/२०००**

**सुरेश द्वादशीवार**
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य
साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

## लेखकाचे दोन शब्द -

कै. डॉ. विद्वद्रत्न केशव लक्ष्मण उर्फ भाऊजी दप्तरी (माझे आजोबा) या नागपूरच्या विद्वान व साधूवृत्तीच्या व्यक्तीच्या जीवनावर आधारलेले हे काल्पनिक नाटक. ह्यातील प्रत्येक घटना त्यांच्या जीवनात घडलेल्या असल्या तरी तंतोतंत नाहीत. नाट्यासाठी त्यात थोडी कल्पना मिसळली आहे. त्यांचे विचार मात्र पूर्णपणे नाटकात तसेच आलेले आहेत. फक्त भाऊजी परलोकाबद्दल तो असेल किंवा नसेल (अज्ञेयवादी) असे मानणारे होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी परलोकाच्या अस्तित्वाविषयीं घेतलेल्या आक्षेपाला उत्तर देतांना भाऊजींनी असे लिहिले आहे की - 'मी परलोक आहे असें मानले तरी त्यावर बुद्धीचे नियंत्रण घालतो ... जोपर्यंत 'मृत्यु' ही गोष्ट आहे तोपर्यंत परलोक ही कल्पना मनुष्याच्या डोक्यात राहणारच. शिवाय ती खंडित करणेही कठीणच आहे.' नाटकात नाट्य आणण्यासाठी तसेच त्यांच्या जीवनाचा पूर्ण आलेख घेण्यासाठी मी मात्र परलोक कल्पिला आहे.

दुसरें, शेवटचा त्यांच्या मृत्युचा प्रसंग नाट्योत्कर्षासाठी म्हणून थोडा बदलविला आहे. महात्मा गांधींच्या खुनानंतर उसळलेल्या दंगलीत भाऊजी जखमी झाले होते हें खरे आहे. पण त्यांचा तीत मृत्यु झाला नाही. पण नंतर लवकरच ते असाध्य रोगाने आजारी झाले. त्या आजारात ते म्हणत की माझा जीवनग्रंथ आटोपलाच आहे. तेव्हा त्यांच्यावर निरातिशय प्रेम करणारे त्यांचे आप्तस्वकीय व चाहते ह्यांनी दुसरे औषध घेऊन पाहावे असे सुचविले. त्यावर त्या थोर पुरुषाने असे उत्तर दिले की, 'आयुष्यभर मी ज्या चिकित्सेची खरी चिकित्सा म्हणून प्रचार केला ती जर मला दुरुस्त करू शकत नसेल तर इतर चिकित्सा मला कशी बरा करू शकेल? आता आयुष्याच्या अंतिम क्षणी मी माझ्या जीवनभर केलेल्या कार्यावर पाणी फेरुन घेऊ काय?'

अशा या माझ्या वंदनीय आजोबाला माझी ही नाट्यरुपी श्रद्धांजली अर्पण.

*लेखक* - **विजय ग. वाटाणे**
१२२, सुरेंद्रनगर, नागपूर-१५
फोन नं. २२८९०७

ॐ

## "ब्रह्मर्षी सत्यकाम"

### अंक १ ला

### (प्रवेश १ ला)

(चित्रगुप्ताचा दरबार, एखाद्या पृथ्वीवरील न्यायालयासारखा. फक्त न्यायाधिशाच्या समोर टेबल नसून चित्रगुप्त एका सिंहासनावर (उच्चासनावर) बसले आहेत. उजवीकडे आरोपीच्या पिंजऱ्यात, वृद्ध सत्यकाम. खादीचे धोतर, अंगरखा, पूर्ण शरीर घोंगडीने लपेटलेले, डोक्यावर काळी घोंगडी टोपी, डोक्यावर शेंडी, संजाब, बाकी गोटा (चम्पीं), दाढी वाढलेली, असे गबाळग्रंथी व्यक्तित्व. चित्रगुप्ताच्या खाली आसनावर त्यांचे कर्मचारी देव. त्यांपैकी एक समोरच्या आसनावर ठेवलेल्या वहीत खटल्याच्या कामकाजाची नोंद करीत आहे. डाव्या बाजूला एक देवासारखा दिसणारा वकील. चित्रगुप्ताच्या वतीने आरोप करतो आहे. असे दृष्य)

**चित्रगुप्त** :- आरोपीचे नाव?

**वकील** :- सत्यकाम.

**चित्रगुप्त** :- राहणार?

**वकील** :- पृथ्वीवरील भारत वर्षातील नागपूर नामक नगरीत.

**चित्रगुप्त** :- पृथ्वीवरून आगमन?

**वकील** :- आत्ताच. काही पळांपूर्वी.

**चित्रगुप्त** :- आरोपीच्या पृथ्वीवरील पापपुण्याचा आढावा?

वकील :- तोच घेण्यासाठी आपल्या दरबारात आणले आहे महाराज - निवाडा करण्यासाठी.

**चित्रगुप्त** :- आरोपीवर काही गंभीर आरोप?

**वकील** :- अनेक महाराज -

**चित्रगुप्त** :- सत्यकामा, तुला तुझी बाजू मांडण्यासाठी वकील हवा असल्यास तो पुरविण्याची व्यवस्था करण्याची आमची प्रथा आहे. दोनही बाजू ऐकल्यावरच निवाडा होईल.

**सत्यकाम** :- महाराज, पृथ्वीवर असतांना मी वकीली करीत होतो. माझी

बाजू मांडायला मी समर्थ आहे, नव्हे माझ्या ऐवजी माझी बाजू दुसरा कुणी मांडील इतक्या योग्यतेचा वकील पृथ्वीवरच नव्हता तर इथे तो कसा असेल?

वकील :- हाच! हाच घमेंडी स्वभाव महाराज याला आयुष्यभर नडला.

सत्यकाम :- घमेंड नव्हे महाराज, वास्तविकता सांगतोय मी. प्रत्येक वेळी मलाच माझे म्हणणे लोकांना पटवून द्यावे लागले. माझ्या बुद्धीने, ज्या ज्या विषयात मला जे जे सत्य दाखविले ते ते मलाच मांडावे लागले. तरीपण इथे तसा कोणी माझ्या तोडीचा वकील असेल तर .....

चित्रगुप्त :- वाटत नाही. तूच तुझी बाजू मांड. कारण उगीच तुझी बाजू चुकीची मांडली गेली असे म्हणायला जागा नको.

सत्यकाम :- मान्य आहे महाराज. हेच जास्त योग्य होईल. माझी बाजू सत्याची आहे. तेव्हा मला कशाची भीती?

वकील :- महाराज, माझी काहीच हरकत नाही. याची वकीली मी जाणतो. हा फक्त केस खरी असेल तरच वकीलपत्र घ्यायचा. एकदा काय झालं –

चित्रगुप्त :- (उत्सुकतेनं) काय?

वकील :- चंद्रपुरात वकीली करीत असतांना ह्याच्याकडे एका विष खाऊन विहीरीत उडी घेतलेल्या बाईची केस आली. त्या बाईनं खोटंच सांगितलं की मी निर्दोष आहे म्हणून.

सत्यकाम :- होय महाराज, म्हणूनच मी तिचं वकीलपत्र घेतलं.

वकील :- अहो, सगळें अशील सुरुवातीला असंच म्हणतात. म्हणून काय-

चित्रगुप्त :- पुढे काय झालं?

वकील :- अहो, कोर्टात केस लढवायला टांग्यातून जातांना शेवटच्या क्षणी त्या बाईनं कबूल केलं की मी जीव द्यायचा प्रयत्न केला होता म्हणून! मग ह्यानं काय केलं असेल महाराज?

चित्रगुप्त :- दुसरं काय - आता खटला चालवणं भागच होतं नाही कां?

वकील :- हे महाराज ताडकन् टांग्यातून खाली उतरले. तिची पूर्ण फी परत केली अन् म्हणाले, "बाई, मी तुमची खोटी केस चालवू शकत नाही. तुम्ही दुसरा वकील पहा." असा हा व्यवहारशून्य.

सत्यकाम :- मग मी काय करायला हवं होतं महाराज?

वकील :- अरे, घेतलेली फी फस्त करून हजर न राहणारे, खोट्याचे खरे करणारे वकील शेकड्याने नव्हे हजाराने मोजता येतील. उलट अशा वकीलालाच पृथ्वीवर निष्णात वकील मानतात आणि हा -

चित्रगुप्त :- पण मला समजत नाही की सत्य गोष्ट सिद्ध करायला वकील हवाच कशाला? मृत्युलोकातले न्यायालय काही वेगळे आहे का?

सत्यकाम :- महाराज, मृत्युलोकात सत्य सिद्ध करण्यासाठीही वकील लागतो. कारण कायद्याची किचकट, गुंतागुंत, पळवाटा, पुराव्यावर आधारलेला न्याय, साक्षीदार, खोटी साक्ष यामुळे खऱ्या केसेस सुद्धा वकीलामार्फतच मांडाव्या लागतात. नाहीतर चोर सोडून संन्यासाचा बळी जाऊ शकतो. गुन्हेगार सुटतो अन् साव सापडतो.

वकील :- (उपहासानं) म्हणूनच तिथं मिळणाऱ्या न्यायाबद्दल अशी उपहासात्मक म्हण आहे की, 'न्यायालयात न्याय मिळतो असं नाही तर न्यायालयात जे मिळतं त्याला न्याय म्हणतात.'

चित्रगुप्त :- सगळा विचित्रपणाच म्हणायचा! पण सत्यकामा, आमच्या इथे असा प्रकार नाही बरं का?

सत्यकाम :- मला माहीत आहे महाराज, म्हणूनच मी निश्चिंत आहे. मला माझी बाजू मांडू द्यावी -

चित्रगुप्त :- अवश्य! (वकीलास) ह्या सत्यकामावर पहिला आरोप कोणता आहे?

वकील :- महाराज, ह्या सत्यकामानं आपल्या कुटुंबियांना नेहमी दुःखच दिलं. आई, वडील, पत्नी, मुलं कोणीच ह्याच्या वागण्यानं सुखी झाले नाही. उलट हा असा वागला की जो तो दुःखीच झाला -

चित्रगुप्त :- पुरावा?

वकील :- महाराज, आपण आपले डोळे मिटावे आणि एक फेब्रुवारी १८९८ (१.२.१८९८) ह्या दिवशी ह्याच्या नागपूर येथील घरी काय घडले ते अंतर्ज्ञानाने प्रत्यक्षच पहावे. आपल्याला सज्जड पुरावा मिळेल. एक फेब्रुवारी १८९८ - स्थळ सत्यकामाचे राहते घर, ओसरी. वेळ- सकाळचे १० वाजले आहेत -

## प्रवेश २ रा

(सत्यकामाचे घर - जुनाट. ओसरी, मध्यभागी माजघरातून ओसरीवर येण्याचे दार. दाराच्या दोन्ही बाजुला दोन खिडक्या, गज लावलेल्या. डावीकडे देवघर, उजवीकडे वर जाणारा जिना, ओसरीच्या खाली बरोबर दारासमोर पायरी. ओसरीच्या एक फूट खाली अंगण, अंगणात उजवीकडे तुळशी वृंदावन, डाव्या बाजुला एका खोलीत जाणारा दरवाजा. अंगणात रांगोळी, ओसरीवर सत्यकामाचे वडील येरझारा घालीत आहेत. हातवारे करीत स्वतःशीच पुटपुटत आहेत. तुळशी वृंदावनापाशी कट्ट्यावर सत्यकामाची मध्यमवयीन आई चिंतेत बसली आहे. ओसरीतल्या जिन्यावर सत्यकामाचा लहान भाऊ दत्तात्रय बसला आहे. भेदरलेला. वय वर्षे १५. एका खिडकीत सत्यकामाची पत्नी सावित्री दिसते आहे. ओढलेल्या चेहऱ्याची, कृश, डोळ्यांभोवती काळे, अशक्त, सासऱ्याच्या रागाने भेदरलेली, वय वर्षे १३, वडील - धोतर, सदरा. दत्तू - पायजामा, अंगरखा, स्त्रिया - नऊवारीत.)

**वडील** :- (येरझारा थांबवून बायकोला) - तुमच्या, ... तुमच्या लाडानं वाया गेला आहे तो - हुं !

**आई** :- आता मी काय लाड केले त्याचे बापा! त्याला चांगलं खाऊपिऊ घातलं. कपडे केले. हा काय माझा गुन्हा झाला? उलट -

**वडील** :- उलट! उलट काय?

**आई** :- उलट तुमच्याच लाडानं तो शेफारला होता असे म्हणतात सगळे.

**वडील** :- तोंड वर करून बोलायला काही वाटते का? अं! माझ्या? काहीतरी बरळायचं, नाहीतर काय?

**आई** :- काहीतरी नाही बरळत मी. खरं तेच बोलतेय. तुमच्याचमुळे तो शेफारला आहे. मलाही असंच वाटू लागलं आहे आता.

**वडील** :- माझ्यामुळे?

**आई** :- हो! हो! तरी मी सारखी आपल्याला बजावत होते की त्याच्या तोंडावर त्याची स्तुती करत जाऊ नका म्हणून. तो शेफारेल,

उद्दाम होईल. पण आपण कुठं ऐकलंत? म्हणे माझा मुलगा - सत्यकाम अलौकिक बुद्धीचा आहे. सत्यनिष्ठ आहे. विद्याभ्यासात त्याचा हात धरणारा कुणी नाही. ज्याच्या त्याच्याजवळ आपल्या मुलाचे गुणगान.

**वडील** :- खोटं काय होतं त्यात? आहेच तो तसा.

**आई** :- अहो खोटं नसेल. पण अशानं मुलं बिघडतात, तोंडावर स्तुती केल्यानं ...

**वडील** :- (तोडत) त्याच्या तोंडावर मी कधीच त्याची स्तुती केली नाही.

**आई** :- पण इतरांकडून कळलं होतंच त्याला. तेवढं पुरेसं होतं ह्या वयात मुलांना ... आणि तोंडावर स्तुती नाही केली तरी ह्या सत्यकामाला पोथ्या पुराणाचा अभ्यास करण्यासाठी त्या मेल्या घाट्याकडे ...

**वडील** :- घाट्या काय म्हणते? घाटेशास्त्री म्हण -

**आई** :- असेल मोठा शास्त्री! मला काय करायचं? पण त्या मेल्या शास्त्र्यानंच माझ्या पोराचं नुकसान केलं.

**वडील** :- तुम्ही आता अकलेचे तारे तोडू नका. त्या घाटेशास्त्र्यांनी त्याचं काय नुकसान केलं? अं? उलट त्याला ज्योतिष्य, गणित, वेद-वेदांगे ह्यात तरबेज केलं. पुराणाचं वाचन करून घेतलं. योग शिकविला -

**आई** :- तेच म्हणते मी - त्या मेल्या घाट्यानं पोराच्या डोक्यात काहीतरी भरवलं आणि पोर घर सोडून पळून गेलं. आज चार महिने झाले. (रडू लागतात.)

**वडील** :- (नरमून) अहो, अहो असे रडूबिडू नका. आम्हाला काय दुःख होत नाही का? एवढा हुशार, बुद्धिमान मुलगा आज चार महिने बेपत्ता आहे. पोलीसात रिपोर्ट देऊनही त्याचा थांगपत्ता लागत नाही. आम्हीही जातीनं तपास केला. नातेवाईक, इष्टमित्र सर्वांना कळविलं. आम्हालाही आतडं आहे म्हटलं.

**आई** :- आपल्या पोटचा मुलगाच तो. पण सूनबाईची काय अवस्था झालीय पाहिलीत का? बिचारी दिवस दिवस नुसती रडत असते. नवरा परत यावा म्हणून माझ्या बरोबरीनं व्रत-वैकल्यं, पोथ्यांची पारायणं, उपासतापास करून कशी वाळून गेली पाहिलंत का?

हाडन् हाड निघालं तिचं ..... न्हाण आल्यावर आपल्या घरी अण्णाने पाठविली तेव्हा कशी लक्ष्मी सारखी दिसत होती! गोरीपान, नाजुक, लांबसडक केस! कशी झालीय आता ती - करपून गेलीय नुसती. काथ्या झालाय केसांच्या.

वडील :- पण तिला हे व्रतवैकल्यं करायला सांगितलं कुणी? तुम्हीच ना? अशानं काही कुणी परत येतं का? नुसता भोळसटपणा -

आई :- हेच! हेच तुमचे सुधारकी विचार! त्यानंच तुमचा तो पोरगाही झपाटला आहे. म्हणे गुरु शोधायला गेलं पाहिजे. (चंपापते)

वडील :- आँ! गुरु शोधायला? काय सांगते काय तू हे आज नवीनच? म्हणजे तुला माहीत होतं आधीच - आहे कुठं मग तो?

आई :- अहो मला तरी कुठं माहीत होतं आजवर. या दत्तूनं सांगितलं आज.

वडील :- दत्त्या! म्हणजे तुला माहीत आहे कुठं आहे तो? मग आजवर मला कां नाही सांगितलं. अं?

दत्तू :- (घाबरून) म्हणजे कुठं आहे हे माहीत नाही मला. पण -

वडील :- (अधीरपणे) पण? पण काय?

दत्तू :- म्हणजे पळून जाण्यापूर्वी काही दिवस भाऊ फार अस्वस्थ दिसले. रोज येरझाऱ्या घालत पुटपुटायचे.

वडील :- काय? काय बडबड करायचा तो?

दत्तू :- त्यावेळी मला बरोबर समजलं नाही. पातंजल योग, ब्रह्मांडाचे रहस्य, गुरुची दीक्षा असं काहीतरी. मला काही उलगडा झाला नव्हता त्यावेळी.

वडील :- त्यावेळी? म्हणजे आता उलगडा झाला म्हणतोस?

दत्तू :- हो. आजच. म्हणजे आत्ताच. आईला सांगितलं मी.

वडील :- आईला सांगितलंस? मला का नाही? अं?

दत्तू :- (चाचरत) म्हणजे सांगणारच होतो. पण मला वाटलं तुम्ही -

वडील :- काही संतापत नाही. सांग. सगळं नीट.

दत्तू :- पातंजल योग शिकण्यासाठी, ब्रह्मांडाचे रहस्य जाणणारा आणि देवाची भेट घडवून देणारा गुरु शोधायला भाऊ हिमालयात निघून गेले असावे.

वडील :- कशावरून तू असं म्हणतोस?

दत्तू :- (खिशातली चिठ्ठी देत) ही भाऊची चिठ्ठी. मला आज सकाळीच अचानक सापडली. त्यांच्या अभ्यासाच्या पुस्तकात. त्यात त्यांनी हे सगळं लिहून ठेवलं आहे.

वडील :- (चिठ्ठी वाचत) तर असं आहे काय? सद्‌गुरुचा शोध घ्यायला हे राजेश्री हिमालयात गेले काय? जे वाचलं त्याचा प्रत्यय घ्यायला पाहिजे म्हणे. प्रत्यक्ष प्रमाण हवे आहे त्याला. वा! मोठा योगीच लागून गेला की नाही?

आई :- (डोळ्याला पदर लावत) हा कोणालाच न सांगता रात्रीच एकाएकी निघून गेला. सकाळी त्या दिवशी किती हाहाकार झाला माहीत आहे ना?

वडील :- (विषण्णपणे) हो चांगलं माहीत आहे. सर्व नातेवाईकांकडे चौकशी केली. पोलीसात रिपोर्ट केला - अरे हो. पोलीस म्हणताच एक आठवण आली - त्यांना आपला हा संशय सांगायला हवा. हे पत्र दाखवायला पाहिजे म्हणजे त्यांना उत्तर हिंदुस्थानात शोध घेता येईल - सापडेल एखाद्या साधू बैराग्याच्या टोळक्यात - मला पोलीस ठाण्यात जायलाच हवं आत्ता.
(जातात. आई ओसरीवर येतात.)

आई :- (किंचित रोषात) झालं! गेले त्या गोऱ्या इन्स्पेक्टरचं डोकं धरायला. मला तर बिचाऱ्याची कीवच यायला लागलीय अलीकडे. सकाळ - संध्याकाळ त्याच्याकडे जाऊन विचारून विचारून नुसतं भंडावून सोडलंय त्याला. तो बिचारा आपल्या मोडक्या तोडक्या हिंदीत काहीतरी सांगत असतो.

दत्तू :- तो म्हणतो तुम्ही काहीच क्ल्यू देत नाही तर आम्ही शोधायचं कुठं? कसं?.

आई :- क्ल्यू म्हणजे?

दत्तू :- अगं आई क्ल्यू म्हणजे चेहरा ओळखायला एखादा फोटो, काही अंदाज वगैरे.

आई :- फोटू? तो दिला होता नं? -

दत्तू :- अगं तो लहानपणीचा काय कामाचा. आता - इतक्यातला.

आई :- इतक्यातला - सूनबाई

(सावित्री बाहेर येते. आणि सासूच्या पुढ्यात बसून रडूं लागते.)

आई :- उगी उगी सूनबाई! अगं येईल तो. सापडेल तुझा नवरा. अगं सावित्रीनं केलं नसेल एवढं तप तू करते आहेस ते काय असंच वाया जाईल? ...

सावित्री :- सासूबाई, मी मागच्या जन्मी कोणतं पाप केलं हो म्हणून माझ्या वाट्याला हे जिणं आलं? मी काय करू हो आता? चार चौघात तोंड दाखवायलाही लाज वाटते.

आई :- अन् आम्हाला काय वाटत नाही? तुझे वडील अण्णा आणि हे बालमित्र. अण्णा मोठे कीर्तनकार! तुझा जन्म झाला आणि हे म्हणाले ह्या माझ्या सुनेला नीट सांभाळ. तुझा नवरा सत्त्या, असेल त्यावेळी पाच-सहा वर्षाचा. पण ह्यांनी ठरवून टाकलं लग्न ह्याच्याशी - पाळण्यातच! हे म्हणाले - अण्णा माझा शब्द म्हणजे काळ्या दगडावरची रेघ! पुढे खरंच तुमचं लग्न मोठ्या थाटात झालं.

सावित्री :- पण अण्णाजी त्याआधीच मला चिडवत - बापूजींची सून म्हणून.

आई :- पण तुला आवडतो का गं हा छांदिष्ट?

सावित्री :- (लाजून) इश्श! काहीतरीच काय?

आई :- नाहीतर काय? अगं हा लहानपणापासूनच असा लाजाळू! कधी डोळे भरून तुला पाहिलं तरी का?

सावित्री :- (लाजून) इश्श!

आई :- इश्श काय? अगं आम्ही लहानपणी लग्न लावून दिलं नसतं ना तुझ्याशी -

दत्तू :- तर भाऊ ब्रह्मचारीच राहीला असता ...सदान्कदा अभ्यास एके अभ्यास. पोथ्या, पुराणं, ज्योतिष्य, काय नं काय. वर गुरुजनांना प्रश्न विचारणं हे असंच का तसंच का? सत्य काय आहे हे शोधण्यासाठी .आपलं तर डोकंच फिरलं असतं.

आई :- त्याचंही फिरलं नं शेवटी!

सावित्री :- (घाबरून) म्हणजे सासूबाई ते आता परत येणार नाहीत? मी ऐकलं आहे असं. संन्याशी परत येत नाहीत म्हणून. एकदा संन्यास घेतला की ...

आई :- अगं वेडे, मला म्हणायचं होतं की त्याच्या डोक्यात एखादी गोष्ट आली की तिचा पुरता छडा लावल्याखेरीज ह्याला दुसरं काही सुचतच नाही. एकच ध्यास!

दत्तू :- वहिनी, अहो तुम्हाला त्याच्या लहानपणची गोष्ट सांगू का? - एका उन्हाळ्यात आम्ही रात्री अंगणात झोपलो होतो. वर छान चांदणं पडलं होतं. अन् भाऊ मला ग्रहताऱ्यांबद्दल काहीबाही सांगू लागला. मला न कळणारं -

आई :- हो नं, मला मेलीला काय समजतं त्यात. मी कौतुकानं म्हटलं - सत्या अरे शेजारच्या बोबड्या सारखं कविता वगैरे करणार आहेस का रे मोठेपणी - तर हसायलाच लागला.

दत्तू :- भाऊ नंतर हसू आवरून म्हणाला, अगं आई कविता काल्पनिक असते. मला त्या 'ग्रहलाघवातील' चूक शोधून काढायची आहे. नंतर खूप रंगात येऊन मला त्याबद्दल सांगू लागला. माझ्यातर डोक्यावरूनच गेलं तेव्हा.

आई :- आता तरी तुला त्यातलं काही कळतं का? असा तुझा नवरा नादिष्ट! एकदा पुरता छडा लावला की येईल परत.

सावित्री :- संन्यास घेतला असला तरी?

दत्तू :- अगं खरा संन्यासी काय होतो तो? खरंच कोणी गुरु भेटला नं तर त्याच्याशीही वाद घालंत बसेल तो. ब्रह्म, माया, वगैरेचा काथ्याकूट करीत.

आई :- हो बाई, मोठ्या मोठ्या लोकांच्या चुका काढायला तो मागे पुढे पाहात नाही. मागे एकदा तो मला सांगत होता. ज्ञानेश्वराच्या वडिलांना संन्यास घेण्याचा अधिकारच नव्हता म्हणून -

दत्तू :- म्हणजे विठ्ठलपंतांना?

सावित्री :- (आशेने) म्हणजे, परत येतील ते?

दत्तू :- (सांत्वनाच्या सुरात) वहिनी, तुझी तपश्चर्या वाया जाणार नाही.

माझं मन मला सांगतं - नक्कीच परत येईल तो.

(बाहेर जय जय रघुवीर समर्थ अशी घोषणा ऐकू येते.)

**आई** :- जा बाई, बाहेर कोणी साधू बैरागी आला असेल त्याला भिक्षा घाल. त्याचा आशीर्वाद घे.

(सावित्री जायला निघणार तितक्यात एक साधू बैरागीच ओसरीवर येतो. केसाच्या जटा वाढलेल्या, दाढी वाढलेली. अंगात मळकट भगवी कफनी. खांद्यावर झोळी. असा वेष पण त्यातही तरुणपणाच्या खुणा लपलेल्या नाहीत. पण खंगलेला, कपाळ भव्य, आडवे गंध, डोळे विलक्षण तेजस्वी.)

**बैरागी** :- (आईला) माई, दरवाजा उघडा होता म्हणून आत आलो. रागावू नकोस. हे घर दुःखात आहे असं मला अंतर्यामी वाटलं म्हणून आलो. आसन देशील?

(आई लगबगीने एक चौरंग आणून देते. त्यावर बसतो)

**आई** :- (सावित्रीस) सूनबाई, अगं घंगाळ आण, पूजेचं सामान घेऊन ये अन् महाराजांची पाद्यपूजा कर.

**बैरागी** :- (तोडत) छे. छे. माई, पूजा वगैरे नको, आम्हाला मान्य नाही. पूजा फक्त परमेशाची. माणसानं माणसाची नाही. सावित्री, तू इथंच थांब.

**आई** :- अगबाई! महाराज आपल्याला हिचं नाव कसं कळलं?

**बैरागी** :- आम्हाला बरंच काही माहिती आहे. हा तुमचा मुलगा दत्तू ना?

**आई** :- हो आणि याचा मोठा भाऊ -

**बैरागी** :- घरातून पळून गेला. चार महिन्यांपूर्वी. पत्ता लागत नाही त्याचा. होय ना?

**आई** :- (भक्तिभावाने नमस्कार करीत) महाराज, आपण खरंच अंतर्यामी आहात. सूनबाई, अगं पाया पड ह्यांच्या (सावित्री पाया पडते) महाराज आमचा सत्यकाम कुठे असेल? काय करीत असेल? परत येईल का हो? चांगला आहे ना तो की .... (पुढचे शब्द रेटता येत नाही. गदगदतात. सावित्री डोळ्याला पदर लावते)

**बैरागी** :- माते, तू काळजी करू नकोस. तुझा सत्यकाम सुखरूप आहे.

परत येईल तो.

आई :- (अधीर होत) परत येईल? नक्की? कधी?

बैरागी :- अधीर होऊ नकोस. लवकरच! अशी अविश्वासानं पाहू नकोस. आम्हाला सगळं अंतर्यामी कळतं. सांगू?

आई :- सांगा सांगा महाराज ... कुठे आहे तो? कसा आहे?

बैरागी :- साधारणतः चार महिन्यांपूर्वी माते तुझा सत्यकाम घरातून पळून गेला होय नं? (आई मान डोलावतात) कशासाठी माहीत आहे?

दत्तू :- देवाचं दर्शन घडवणारा, पातंजल योग शिकविणारा गुरू शोधायला, ब्रह्माचे रहस्य उलगडून दाखविणारा सद्‌गुरु शोधून काढण्यासाठी.

बैरागी :- बरोबर! त्यासाठी प्रथम तो दक्षिणेकडे गेला. पंढरपूर, आळंदीकडे नंतर पूर्व पश्चिम भटकंती करीत शेवटी उत्तरेकडे हिमालयात देखील हिंडला. उन्हातान्हात, थंडी-वाऱ्यात, पावसात भिक्षांदेही करीत, उपासतापास काढीत एकच ध्यास. सद्‌गुरुचा शोध.

दत्तू :- मग मिळाला का त्याला सद्‌गुरु?

बैरागी :- साऱ्या गुरू म्हणवणाऱ्यांशी ह्यानं चर्चा केली. वाद घातले. प्रत्यक्ष प्रमाण मागितले. देव दाखवा म्हणाला.

आई :- मग?

बैरागी :- त्याला असा गुरू सापडला नाही. त्याला हवा होता तसा देवदर्शन घडविणारा. ब्रह्मांडाचे खरे रहस्य सांगणारा सद्‌गुरु मिळणे अशक्य आहे अशी त्याची खात्री झाली.

दत्तू :- मग तो घरी परतणार म्हणता? केव्हा? महाराज. आपण अंतर्यामी आहात. मग सांगा कुठं आहे तो? कसा आहे?

आई :- (एकदम व्याकुळ) महाराज, बोला ना. इकडे आमची कशी दशा झालीय ती पाहता ना आपण? ही सूनबाई कशी झालीय, हा त्याचा भाऊ .. सत्यकामा अरे किती छळशील? किती अंत पाहशील रे आमचा? सूनबाईचा? सूनबाई, अगं महाराजांपुढे लोटांगण घाल. पाय घट्ट धर त्यांचे (अनावर शोकानं गदगदून येते, रडू लागते. सावित्री महाराजांपुढे लोटांगण घालण्यास जाणार इतक्यात बैरागी -)

सत्यकाम :- (मूळ आवाजात) आई! आई ओळखलं नाहीस मला तू? अगं मीच तुझा सत्यकाम. परत आलोय. अगं पाहतेस काय अशी डोळे विस्फारून?

आई :- (अविश्वासानं) कोण सत्या तू?

दत्तू :- (जवळ जाऊन निरखित) भाऊ तुम्ही?

(सावित्री एकदम जरा दूर उभी राहून निरखून पाहते.)

सत्यकाम :- (हसत) अरे, जरा गंमत केली तुमची. ह्या भगव्या वेषात अन् दाढी मिशांच्या जंगलात तुम्ही मला ओळखता की नाही ते पाहिलं. जरा आवाज बदलला इतकंच. थट्टा केली.

आई :- थट्टा? थट्टा केली? इकडे आमचा जीव व्याकुळ झाला आहे. ती तुझी बायको झुरून वाळत चाललीय अन् तुला थट्टा सुचली - बायकोकडे बघूनही तुझं हृदय द्रवलं नाही? असा कसा रे तू कठोर?

सत्यकाम :- (उठून तिच्या पाया पडत) चुकलो आई. क्षमा कर. असं वागायला नको होतं मी. क्षमा कर मला. बापू एकवेळ क्षमा करणार नाहीत. पण तू तशी नाहीस आई.

आई :- (उठून त्याला आपल्या पोटाशी घेत) किती वाळलास रे सत्या. काय दशा करून घेतलीस आपली? कसा राहिलास? काय खाल्लंस? कशी पायपीट केलीस? कशासाठी? असं कसं रे तुझं हे वेड -

सत्यकाम :- आई हे वेड - जसं रामदासस्वामीचं वेड, ज्ञानोबांचं वेड, व्यासांचं वेड - सत्यशोधकाचं वेड.

आई :- जाऊ दे. पण आता नाही ना असा पळून जायचास?

सत्यकाम :- छे. छे आता प्रथम इंटरची परीक्षा देणार. पहिल्या क्रमांकानं पास होणार.

दत्तू :- पण भाऊ, परीक्षेला एकच महिना उरलाय. तुझा अभ्यास कसा होईल?

सत्यकाम :- अभ्यास फार पूर्वीच झालाय. थोडी उजळणी करावी लागेल. झालं.

दत्तू :- पण उत्तीर्ण पहिल्या क्रमांकानं?

सत्यकाम :- अरे युनिव्हर्सिटी मला पहिल्या क्रमाकांत उत्तीर्ण करणार नाही तर कुणाला?

(इतक्यात बापूजी - सत्यकामचे वडील येतात.)

बापूजी :- (येत) तो गोरा इन्स्पेक्टर म्हणाला, साधू बैराग्यांच्या टोळक्यात शोधावं लागेल सत्यकामाला.

(सारे हसू लागतात. सावित्री पदराआड हसू लपवते. सत्यकाम बापूजींच्या पाया पडतो.)

बापूजी :- आँ! हा कोण बुवा?

सत्यकाम :- बापूजी, मी सत्यकाम. परत आलोय. क्षमा करा मला. चुकी झाली माझी. (पायांवर लोटांगण घालतो.)

बापू :- सत्यकाम? (डोळे विस्फारून पाहात असतानाच अंधार)

**प्रवेश ३ रा**

(चित्रगुप्ताचा दरबार. पण पूर्ण दिसत नाही फक्त सिंहासनाधिष्ठित चित्रगुप्त. कठड्यातला सत्यकाम व वकील यांच्यावर उजेड. बाकी सारे अंधारात.)

चित्रगुप्त :- सत्यकामा, तुला आरोप मान्य आहे?

सत्यकाम :- नाही महाराज! मुळीच नाही!

वकील :- नुसतं नाही म्हणून चालत नसतं सत्यकामा. युक्तीवाद करावा लागतो. समर्थन करण्यासाठी.

चित्रगुप्त :- बरोबर. तू तुझ्या कुटुंबाला दुःखात लोटलं नव्हतंस?

सत्यकाम :- माझ्या कृतीमुळे त्यांना दुःख झालं हे खरं महाराज. अन् त्याबद्दल मी क्षमाही मागितली. पण सत्य शोधण्यासाठी जे करावं लागतं, आवश्यक असतं. ते करण्यासाठी मी घरदार सोडलं. ते जर दोषास्पद असेल तर मग तसे दोषी यापूर्वीही अनेक होऊन गेले. ते महात्मे जर दोषी असतील तर -

चित्रगुप्त :- उदाहरणार्थ?

सत्यकाम :- बुद्ध! आपल्या पत्नीचा, लहानग्या बाळाचा इतकेच नव्हे तर राजत्याग करून तो सत्य शोधण्यास बाहेर पडला. कुणालाही न कळवता. आद्य शंकराचार्यांनी सुद्धा संन्यास घेतला.

वकील :- (तोडत मिष्कीलपणे) त्यांची तेवढीच कृती तुला पटलेली दिसते.

सत्यकाम :- (ठामपणे) नाही. कर्म-संन्यास मला कधीच पटला नाही. पण इथे मला त्यांनी आईची फसवून घेतलेली संमती गृहीत आहे.

वकील :- पण कुणालाही न कळवता गुपचूप पळून जाण्याची तुला काहीच आवश्यकता नव्हती.

सत्यकाम :- (हसून) वकील महाशय, तुमच्या बुद्धीची मला कीव येते. वाडवडिलांची संमती घेऊन असे कार्य होत असते काय? आजवरचे अनेक संशोधक, महात्मे, क्रांतिकारक यांनी जे काही कार्य केले ते काय वाडवडिलांचे संमतीने? अशानं तर काही करताच येणार नाही नवीन पिढीला.

चित्रगुप्त :- उदाहरणार्थ -

सत्यकाम :- अहो, स्वातंत्र्य लढ्यात अनेक क्रांतिकारकांनी भाग घेतला, जनजागरण करण्यासाठी वनवास भोगला तो काय वाडवडिलांची संमती घेऊन?

वकील :- समजलं महाराज, यानं आपल्या कुटुंबाला पदोपदी दुःखच दिलं आहे. तो याचा स्थायीभावच आहे आणि त्याचं हे एकच उदाहरण नाही महाराज. हे केवळ एक नमुना म्हणून दाखल केलं. सर्व आयुष्यभर याने अनेकांना, अनेकवेळी दुःखच दिलं आहे. अपेक्षाभंग केला आहे.

चित्रगुप्त :- अपेक्षाभंग? हा नवीनच आरोप दिसतो ...

वकील :- होय महाराज, अपेक्षाभंग!

चित्रगुप्त :- कुणाचा?

वकील :- कुणाकुणाचा म्हणून सांगू? पण अत्यंत जवळचे म्हणजे आई-वडील, गुरु, भावंडं यांचा.

चित्रगुप्ता :- सविस्तर सांग.

वकील :- महाराज, आपल्या पोटी आलेल्या आणि अलौकिक बुद्धीमत्ता लाभलेल्या मुलाला खस्ता खाऊन शिकविणाऱ्या, मोठं करणाऱ्या मुलाकडून आई-वडिलांनी काही अपेक्षा ठेवल्या तर त्यात काही चूक आहे काय?

चित्रगुप्त :- मुळीच नाही.

वकील :- ह्या सत्यकामाचे वडील बापूजी. एक गरीब शाळा मास्तर. त्यांनी घरी अठराविश्व दारीद्रय असूनही व मोठे कुटुंब चालवूनही याची बुद्धिमत्ता हेरून खूप शिकविले. बी.ए., एल.एल.बी वकील केले. .... ह्यांनी वकीली सुरू केली तेव्हा आता आपल्याला सुखाचे दिवस येतील. असं वाटत होतं त्यांना. पण कसंच काय अन् कसंच काय.

चित्रगुप्त :- (उत्सुकतेनं) काय झालं?

वकील :- ह्याच्या वकीलीची तऱ्हा मघाशी सांगितलीच. तरी पण ह्याची हुशारी पाहून सरकारनं ह्याला सरकारी वकील म्हणून नेमणूक देऊ केली. सर्वजण आनंदानं मोहरून गेले. ज्या दिवशी तो सरकारी लखोटा ह्याच्या घरी आला त्या दिवशी - ती सकाळ डोळ्यांसमोर आणा महाराज - (अंधार)

**(प्रवेश ४ था)**

(आधीच्याच दृश्यातील ओसरी. सकाळचे दहा वाजले आहेत. ओसरीवरील देवघरासमोर नुसतं धोतर नेसलेले उघडे बापू देवाला हात जोडून उभे असलेले. बाकी कुणीच नाही. पोस्टमन अशी हाक ऐकू येताच दत्तू आतून येऊन बाहेर जातो. बापूंच्या ओसरीवर येरझाऱ्या. दत्तू येतांना हातात एक पिवळा लिफाफा घेऊन येतो.)

बापूजी :- दत्त्या? काय आहे रे?

दत्तू :- पाहतो (लिफाफा फोडून वाचत) बापूजी, एक आनंदाची बातमी. आपल्या भाऊजींची सरकारी वकील म्हणून नेमणूक केलीय इंग्रज सरकारनं. हा पहा ऑर्डर.

बापू :- (आनंदानं) काय म्हणतोस काय? (देवाला नमस्कार करीत) देवच पावला म्हणायचा. इतक्या वर्षांची तपश्चर्या फळाला आली. अहो! इकडे या. (आई दारात येतात) आपल्या भाऊला सरकारी वकील केलंय सरकारनं. कुठं आहे तो?

आई :- सांगून जातो का तो कधी? सकाळीच गेलाय लगबगीनं. एक

जाड पुस्तक घेऊन... पण सरकारी वकील म्हणजे?

बापू :- अहो त्याला आता भरपूर पगार मिळणार सरकारकडून सरकारी केसेस चालविण्यासाठी.

आई :- म्हणजे आता भाऊ वकीली करणार नाही?

बापू :- अहो वकीलीच करणार पण -

दत्तू :- पण सरकारची .. बरं झालं. नाहीतरी भाऊची वकीली रुट्खुट्च चालली होती. सत्त्याचे अवतार ना ते. आता -

बापू :- आता आपलं दारिद्रय मिटलं. इतके दिवस खस्ता खाल्ल्या त्याचं चीज झालं. आता तो मोठा वकील होणार ... पुढे -

दत्तू :- पुढे जज् .. मलाहि माझं शिक्षण पूर्ण करता येईल.

बापू :- संशयच नाही. दिवस बदलले आपले. दत्त्या, त्याच्या गुरुला घाटेशास्त्र्यांना बातमी सांग. बोलावून आण. या म्हणा पेढे खायला. येतांना पेढेच घेऊन ये.

दत्तू :- (आनंदानं) हो, हो. आणतो. (जातो)

आई :- (देवाला नमस्कार करीत) आई जगदंबे पावलीस गं बाई नवसाला. सुखाचे चार दिवस दिसतील आता आपल्याला. सावित्री अगं सावित्री बाहेर ये. (सावित्री खिडकीत येते. चेहरा आनंदाने डंवरलाय नुसता) अगं ऐकलं का? आपला भाऊ आता सरकारी वकील झालाय. खूप पगार मिळणार म्हणे त्याला. पहिल्या पगारातच तुला सोन्याचं मंगळसूत्र आणि हातात दोन बांगड्या...

बापू :- झाले का मनातले मांडे सुरू - एवढ्यानं काय होतंय... चांगले मणभर दागिने घाला तिला ... आणि तुमचीही पैठणीची हौस फेडून घ्या.

आई :- (लाजून) इश्श! पैठणी नेसायचं का वय राहिलंय माझं आता, सूनबाई बिचारी काळी पोत घालून असते दिवसभर. म्हणून म्हणाले. सूनबाई -

(सावित्री बाहेर येऊन आधी देवाला नि नंतर सासू-सासऱ्यांना नमस्कार करते. चेहऱ्यावर हर्ष नुसता ओसंडत आहे. सावित्री आता १६-१७ वर्षाची झाली आहे.)

आई :- सूनबाई समजली का गं तुला आनंदाची बातमी? आपला भाऊ -

सावित्री :- आतून ऐकलंय मी ते. (लाजते)

बापू :- (थट्टेनं) आत्ता काय बोवा, थाट आहे वकीलीणबाईचा! अंगावर भरजरी शालू, मणभर दागिने अन् दारात टांगा ...वकीलीणबाई आपल्या गरीब सासू-सासऱ्यांकडे लक्ष देणार ना पण?

सावित्री :- (लाजून) हे हो काय बापूजी?

आई :- (कड घेत) असं हो काय चिडवता तिला? अशी आहे वाटतं ती? दत्तूवर किती माया आहे तिची. माहीत आहे नं?

बापू :- हो (पैसा अशी खूण करीत) पण ही माया मोठी मायावी असते बरं. मोठ्यामोठ्यांचे स्वभाव बदलविते. म्हणून खुंटा हलवून बळकट केला. असो. (खुंटीवरील सदरा अंगात घालीत) हिच्या वडिलांना अण्णाजींना स्वतः जाऊन ही बातमी कळवून घेऊनच येतो .. भाऊनं मागे घर सोडलं होतं तेव्हा तो किती हवालदिल झाला होता, आठवतं? म्हणाला होता - हुषारी आणि विक्षिप्तपणा ह्यांचं एकमेकाशी अतूट नातं असलंच पाहिजे का रे? मलाच अपराधी वाटत होतं त्यावेळी.

आई :- मला तर बाई मेल्याहून मेलं झालं होतं. कोणत्या तोंडानं त्यांच्या समोर उभी राहू? ... (उसासून) चला. झालं गेलं गंगेला मिळालं. अंबाबाईच्या कृपेनं भाऊ परत आला. शिकला सवरला. मोठा वकील का बॅरिस्टर म्हणतात तो झाला अन् -

बापू :- आता सरकारी वकील! मी सांगतो तुम्हाला - पुढे तो नक्कीच जज् होणार आपल्या हुषारीनं, शंकाच नको.

आई :- तोंडात साखर पडो तुमच्या.

बापू :- आधी अण्णाला केव्हा जाऊन सांगतो असं झालंय मला. मी निघालो. त्या घाटेशास्त्र्यांना बसवून ठेवा माझ्या माघारी आला तर .. हा दत्ता कसा नाही आला अजून? कां हाही बसला त्यांच्याशी चर्चा करीत. काळवेळाचं भान -

(तेव्हढ्यात दत्तू पेढ्यांचा पुडा घेऊन आंत येतो.)

दत्तू :- (आईला) आई, हा पेढ्यांचा पुडा.

आई :- ठेव देवासमोर. (दत्तू पेढ्यांचा पुडा देवासमोर ठेवतो)

बापू :- काय म्हणाले घाटेशास्त्री ?

दत्तू :- लगेच येतो म्हणाले. खूप आनंद झाला त्यांना.

बापू :- होणारच ! बरं माझी टोपी द्या (सावित्री टोपी आणून देते) त्या शास्त्र्याशी नीट वागा आतातरी. भाऊ गुरु मानतो त्यांना. (जातात)

दत्तू :- आई, कुठं निघालेत बापू ?

आई :- अण्णाजीपंतांना ही आनंदाची बातमी कळवायला.

दत्तू :- असं होय ! (वहिनीकडे पाहात) आता काय बुवा वहिनींचा थाट ! (गातो) श्रीमंत पतीची राऽऽणी मग थाट काय तो पुसता ऽऽ

सावित्री :- दत्तूभाऊजी किती थट्टा करायची मेली. काही सुमार ?

दत्तू :- अहो थट्टा काय म्हणता ? वस्तुस्थिती आहे. थोडा काळ जाऊ द्या मग पहा. दाराशी हत्ती झुलतील हत्ती !

आई :- मेल्या तुझ्या जीभेला काही हाड ? आपण काय असे तालेवार लागून गेलो.

दत्तू :- आई, खरंच. तुला कल्पनाच करवणार नाही. (गदगदून) हे आता दारिद्र्याचे मनोरथ राहिले नाहीत .. आई, वहिनी खूप सोसलं तुम्ही. पण शेवटी फळाला आली तुमची तपश्चर्या. माझं पण शिक्षण पुरं होणार आता (थट्टेनं) अर्थात वहिनींनी शिफारस केली भाऊजवळ तर ....

सावित्री :- भाऊजी, असं बोलवतं तरी कसं तुम्हाला ? ह्यांनी कधीतरी तुमच्या शिक्षणाबद्दल मागंपुढं पाहिलं ? अशाही परिस्थितीत एका अनाथ मुलाचं शिक्षण करतात आहेत ना ते ? मग तुमचं शिक्षण- (सत्यकाम प्रवेश करतो. डोक्यावर खादीची पांढरी टोपी. खादीचे धोतर, सदरा, उपरणं, गोरापान, स्वच्छ दाढी. टिळकांसारख्या झुपकेदार मिशा. उभं गंध.)

सत्यकाम :- (प्रवेशत) पूर्ण करायचंच. ह्यात शंकाच नाही. मात्र -

दत्तू :- मात्र काय भाऊ ?

सत्यकाम :- परिश्रम ज्याचे त्यानेच करायचे. समजलं का राजेश्री ? आम्ही फक्त खर्चाचा वाटा उचलणार.

आई :- अरे सत्यकामा आता तर तीही काळजी मिटली.

सत्यकाम :- (उपरणे खुंटीवर ठेवत व टोपी काढत) काळजी? काळजी कसली? आम्ही कधी काळजी केली? हो. काळजी केली पण ती याला त्याचं आवडतं आणि योग्य शिक्षण देण्याची. बाकी -

आई :- अरे, त्या अर्थानं नाही म्हणाले मी .. आता तुला .. (अडखळते) .. दत्ता, तूच सांग रे बाबा काय ते.

सत्यकाम :- काय सांग? ह्या दत्तानं शिक्षण सोडून कुठं नोकरीबिकरी तर धरली नाही? काय रे दत्त्या?

दत्तू :- नाही भाऊ - पण मघाशी तुम्ही बाहेर गेला होता नं तेव्हढ्यात तुमच्या नावानं हा सरकारी लखोटा आला. तुम्हाला सरकारी वकील नेमण्याचा निर्णय घेतलाय सरकारनं.

सत्यकाम :- (उत्तेजित होऊन) काय?

दत्तू :- होय बापू गेले ही आनंदाची बातमी कळवायला अण्णाजींकडे. अन् मी तुमच्या गुरुंना कळवली ही बातमी - येतीलच ते एवढ्यात -

सत्यकाम :- (दरडावून) ही नसती उठाठेव करायला तुला कुणी सांगितलं रे?

आई/दत्तू :- (एकदम) नस्ती उठाठेव?

सत्यकाम :- हो. नसती उठाठेव! अरे, परकीय सरकारची नोकरी मी करीनच कशी? तुम्हाला माझी मतं माहीत नाहीत का?

दत्तू :- बापू म्हणाले म्हणून -

सत्यकाम :- (तोडत) त्यांना माहीत नाहीत? मी सरकारी नोकरी न करण्याची शपथ घेतली आहे म्हणून -

दत्तू :- (अडखळत) तशी ही इंग्रज सरकारची प्रत्यक्ष नोकरी नाहीच मुळी. वकीलीच करायची पण सरकारतर्फे.

सत्यकाम :- म्हणजे खऱ्याचं खोटं करावं लागणार नाही म्हणतोस? अरे, तुला माहीत नाही इंग्रज सरकारची नीती. खोटे पुरावे गोळा करून किती देशभक्तांना त्यांनी फासावर चढवलं, कारागृहात डांबलं .. आणि मी काँग्रेसचा सच्चा सेवक .. (काय बोलावं कसं बोलावं सुचत नाही असा सुरांत) पण तुम्हाला वाटलंच कसं? मी

ही ऑफर स्वीकारीन म्हणून -

(घाटेशास्त्री प्रवेश करतात. डोक्यावर पागोटे, बाराबंदी, धोतर)

घाटेशास्त्री :- (तोडत) अरे सत्यकामा, तू एवढा शिकला सवरलास, त्यासाठी तुझ्या घरच्यांनी, बापूंनी इतक्या खस्ता खाल्ल्या तेव्हा त्यांची ही अपेक्षा वाजवी नाही असं कसं म्हणतोस तू? पितृऋण फेडण्याची ही एवढी चांगली संधी चालून आलेली असतांना मला वाटतं की तू ही संधी सोडू नकोस.

सत्यकाम :- गुरुजी, तुम्ही सुद्धा!

घाटेशास्त्री :- हो. हो. मी सुद्धा. माझे सुद्धा हेच मत आहे. अरे, राजा हा विष्णूचा अंश. त्याची चाकरी करण्यात वावगे ते काय?

सत्यकाम :- पंचम जार्ज हा विष्णूचा अवतार? (हसून) गुरुजी, काय सांगताय काय? अहो, त्या इंग्रज राजाला तरी माहीत असेल का की आपण विष्णूचे अवतार आहोत म्हणून. आणि हा विष्णूचा अवतार इतका जुलमी? आपल्याच प्रजेवर अत्याचार करणारा? गुरुजी, कोणत्या युगात वावरता तुम्ही? लोकमान्यांचा केसरी कधी वाचला आहे का?

(बापू, अण्णाजी प्रवेश करतात.)

बापू :- (रागाने) सत्यकामा, प्रत्यक्ष गुरूची थट्टा? काय चालवलं काय तू हे?.

सत्यकाम :- (ताठमानेनं) खऱ्या गुरूचं काम शिष्याला योग्य मार्गदर्शन करायचं. तेच जर चुकीचे मार्गदर्शन करायला लागले तर -

बापू :- (तोडत) कोणता चुकीचा मार्ग?

सत्यकाम :- मला सरकारनं देऊ केलेली नोकरी स्वीकारण्याचा.

बापू :- मग चूक काय आहे त्यात? तुझंच भलं आहे त्यात.

सत्यकाम :- माझं भलं कशात आहे हे मला चांगलं कळतं. इंग्रज सरकारची नोकरी मी करणार नाही ही माझी प्रतिज्ञा आहे.

अण्णाजीपंत :- (अजीजीनं) आपण आपल्या कुटुंबीयांचा विचार करावा.

सत्यकाम :- त्यांची जबाबदारी टाळत नाही मी. पण ही नोकरी स्वीकारुनच ती पार पाडता येते असे समजत नाही मी.

बापू :- (उद्वेगानं) आम्ही जन्मभर दारिद्र्यातच खितपत पडावं असं वाटतं तुला? त्यासाठी का आम्ही तुला वाढवलं, एवढं शिकवलं? हेच फळ काय आमच्या त्यागाला?

सत्यकाम :- (सद्‌गदित) बापू, त्याबद्दल ऋणी आहे मी तुमचा, जन्मोजन्मी. पण काय करू? माझा जन्म पारतंत्र्यात झाला. हा काय माझा दोष? आज प्रत्येक भारतीयाचं पहिलं कर्तव्य देशाचं स्वातंत्र्य मिळविण्याचा यथाशक्ती प्रयत्न करणं ... लोकमान्य टिळक, आगरकर, महात्मा गांधी हे काय कमी शिकले आहेत? लोकमान्य काय घरचे श्रीमंत होते? त्यांना काय सरकार दरबारी मोठा, मानाचा हुद्दा नसता मिळवता आला? लाल लजपतराय, गांधी, नेहरू,वल्लभभाई पटेल -

बापू :- (हेटाळणी करीत) तू, त्यांची बरोबरी करतोस? ते कुठं अन्‌ तू कुठं.

सत्यकाम :- बरोबरी करीत नाही मी बापू. ह्या स्वातंत्र्यसमरातील खारीचा वाटा उचलण्याचा माझा प्रयत्न आहे. त्याची पहिली पायरी इंग्रज सरकारशी असहकार!

घाटेशास्त्री :- अरे कुठे तो इंग्रज आणि कुठे तुम्ही? साता समुद्रापलिकडून तो तुमच्यावर राज्य करतो, असे त्याचे सामर्थ्य. कसे लढणार रे तुम्ही त्याच्याशी? तुमच्याजवळ शस्त्र तरी आहेत का? अरे, रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले. तो गांधी एक मूर्ख आणि तुम्ही -

सत्यकाम :- (चिडून) महामूर्ख! असंच ना? गुरुजी, शहाणे असाल, नव्हे आहातच, तर एक शब्द पुढे बोलू नका. आणि आपला अपमान करून घेऊ नका. ह्या विषयात बोलण्याचा तुमचा अधिकार नाही. मी ऐकणार नाही. तेव्हा -

घाटेशास्त्री :- (रागाने बापूला) मी निघतो. जीव गेला तरी पुन्हा ह्या घराची पायरी चढणार नाही. सोबत पेढे आणले होते ते घ्या. वाटून टाका भिकाऱ्यांना ... ज्या घरात ... ज्या घरात गुरूचा अपमान होतो त्या घरात मी .. मी.. (पुढे शब्द सुचत नाही. रागानं

पेढ्याचा पुडा टाकून फणफणत निघून जातात.)

**बापू** :- (रागात) काय म्हणून तू अपमान केलास त्यांचा? सत्यकामा तू हे चांगलं केलं नाहीस.

**सत्यकाम** :- (शांतपणे) त्यांनी वाटेल ते बरळण्यास सुरुवात केल्यावर -

**बापू** :- वाटेल ते?

**सत्यकाम** :- होय! काय वाटेल ते. मी इंग्रज सरकारची नोकरी करावी की करू नये हा माझा विषय होता. त्यांत त्यांना टिळक, गांधी वगैरेंना ओढण्याची काहीच गरज नव्हती. त्यांनी आपलं मत मांडलं. झालं. संपलं. माझा निर्णय मी घेतलेला होता. तो मी त्यांना स्पष्ट करून सांगितला - इथेच संपवायला हवं होतं त्यांनी -

**बापू** :- म्हणजे तुझा निर्णय पक्का आहे तर.

**सत्यकाम** :- हो बापू. अण्णाजी. इंग्रजांची नोकरी मी पत्करणार नाही. ही दगडावरची रेघ समजा तुम्ही. परकीय सरकारची चाकरी हा माझा सामाजिक मृत्यु आहे. त्यात कसला आला आहे आनंद?

**अण्णाजी** :- अहो पण मी काय म्हणतो, आपण जर ..

**सत्यकाम** :- (तोडत) बस्स! ह्यापुढे हा अप्रिय विषय बंद. मला इतर बरीच कामे आहेत. (झटक्याने आत निघून जातो. बापू हताश. अण्णांकडे पाहतात. अण्णाजीपंत एकवार सावित्रीकडे पाहतात. तिच्या व आईच्या डोळ्यांना पदर. डोळ्यांच्या कडा पुसत अण्णाजी निघून जातात. कोपऱ्यात दत्तू थिजल्यासारखा उभा. त्याच्यावर स्पॉट. नंतर अंधार.)

## प्रवेश ५ वा

(चित्रगुप्त, वकील व सत्यकाम यांच्यावर पूर्वीप्रमाणेच स्पॉट)

**चित्रगुप्त** :- सत्यकामा, आरोप मान्य आहे?

**सत्यकाम** :- मुळीच नाही महाराज. मी सरकारची चाकरी कां स्वीकारली नाही हे मी बापूंना सांगितलंच होतं. आणि ते सत्यही होतं.

**वकील** :- हो. पण त्यामुळे त्यांचा सर्वांचा अपेक्षाभंग झाला हे सत्य उरतंच.

सत्यकाम :- (आवेशानं) पण त्यांनी अशी अपेक्षाच का बाळगावी महाराज? महाराज आपल्या अपत्याचं योग्य संगोपन करणं, योग्य शिक्षण देऊन त्यांना आपल्या पायांवर उभं करणं हे प्रत्येक मातापित्याचं कर्तव्यच आहे. पण हे सर्व करतांना त्यांनी मनात अपेक्षा ठेवल्या असतील तर तो दोष त्यांचा आहे. मुलाचा नाही. फळाची आसक्ती ठेवून कर्म करणे निदान आदर्श मातापित्यांना तरी शोभणारं नाही. अनासक्त कर्मयोगाबद्दल खरं म्हणजे मी आपल्याला कांही सांगणं म्हणजे -

वकील :- हे वकीली उत्तर झालं महाराज. पण ह्याच्या अशा वागण्यामुळे बापूजींनी हाय खाल्ली अन् परिणामी त्यांचा अकाली मृत्यू झाला.

सत्यकाम :- आपल्या राज्यातहि अकाली मृत्यू होऊं शकतो महाराज?

चित्रगुप्त :- नाही. त्यांचे दिवस भरले असतील. वकीला, उगीच क्षुल्लक मुद्दे काढून आमचा वेळ व्यर्थ घालवू नकोस. पुढील आरोप मांड.

वकील :- भ्रष्टाचार!

चित्रगुप्त :- (आश्चर्यानं) भ्रष्टाचार? कसा?

वकील :- धर्मात ढवळाढवळ. वडिलांच्या श्राद्धदिनी ह्याच्या विलक्षण हटवादीपणामुळे जो भ्रष्टाचार माजला तो तर मुळीच समर्थनीय नाही.

चित्रगुप्त :- भ्रष्टाचार? धर्मात? सत्यकामानं केला?

वकील :- होय महाराज. वैदिक धर्मात पूर्वापार चालत आलेल्या परंपरेला सोडून तीत ढवळाढवळ करून यानं साऱ्या समाजात भ्रष्टाचार माजवला - समर्थन केलं.

चित्रगुप्त :- (उत्सुकतेनं) असं? मला अंतर्ज्ञानानं पाहिलाच पाहिजे हा प्रकार मग.

वकील :- तर मग मिटावे नेत्र. आश्विन शुद्ध द्वितीया - शके .... (अंधार)

## प्रवेश ६ वा

(ओसरीवर पाच ब्राह्मणांची पंगत बसली आहे. सत्यकाम उभा राहून हात जोडून समाचार घेण्यासाठी उभा आहे. बायका वाढतात आहेत. दत्तू पाणी वगैरे व्यवस्था पाहात आहे. सत्यकाम

व दत्तू सोवळ्यात आहेत. आता जेवण सुरू होणार तोच बाहेरून दारावर भिकारणीची आर्त हाक ऐकू येते.)

**भिकारीण** :- देवं माय! एखादा भाकरतुकडा वाढ वं माय. दोन दिसांची उपासी हाये. धर्म करा वं माय. माहं लेकरू बी उपासी हाय वो माय. पोटाले भाकरतुकडा, शिळंपाकं घाला.

**सत्यकाम** :- अरे दत्तू त्या भिकारणीला म्हणावं थोड्या वेळानं ये. पंगत आटोपली की वाढतो तुला. (दत्तू जातो)

**सत्यकाम** :- (ब्राह्मणांना हात जोडून) आपण भोजनाला सुरुवात करावी. (ब्राह्मण एकमेकात नेत्रपल्लवी करीत असतांनाच दत्तू येतो.)

**दत्तू** :- भाऊजी, ती भिकारीण ऐकतच नाही. आताच वाढा म्हणते. आताच वाढा म्हणून बसकणच मारली आहे तिनं दारात. धक्के मारून घालवलं असतं. पण मी सोवळ्यात - दुसऱ्या कुणाला सांगू?

**सत्यकाम** :- थांब!
(बाहेर जातो. तसे ब्राह्मणात नेत्रपल्लवी थांबून हलक्या आवाजात कुजबुज सुरू होते. इतक्यात सुरू करू नका म्हणून खाणाखुणा)

**दत्तू** :- (हात जोडून) आपण सुरुवात करावी.

**सत्यकाम** :- (बाहेरून आवाज येतो) का गं ए. तुले सांगितलं ना. जरा वेळानं ये म्हून. मंग? आता बामन मंडळी जेवायले बसतेत नव्हं. त्याहिचं झालं की ये म्हनलं तर -

**भिकारीण** :- (बाहेरूनच) भाऊ, मले आताच जेवाले दे नं. दोन दिसाची उपासी हाय मी. माहा पोर!

**सत्यकाम** :- खरं सांगतेस?

**भिकारीण** :- जी. देवाच्यान !

**सत्यकाम** :- हात पुढं कर.

**भिकारीण** :- मी महार हाये जी. मले शिवू नका. विटाळ होईल तुम्हाले.

**सत्यकाम** :- (दरडावून) हात पुढे कर म्हणतो ना. तुला काय करायचंय? (स्वगत) बापरे हिची नाडी खरंच क्षीण झाली आहे भुकेनं. ताबडतोब अन्न मिळालं नाही तर? (उघड) ये वं. आत ये. तुले

जेवायले देतो.

(सत्यकाम त्या भिकारणीला व तिच्या मुलाला धरून आत घेऊन येतो. त्याक्षणीच सारा ब्रह्मवृंद उठून उभा राहातो.)

**सत्यकाम** :- अरे दत्तू, ह्या भिकारणीचं पान मांड रे. तिकडे कोपऱ्यात.

**दत्तू** :- (घाबरून) भाऊ, काय म्हणता काय? पान मांडू? हिचं? (ब्राह्मणांकडे पाहात) ह्यांच्या बरोबर?

**सत्यकाम** :- तिकडे. कोपऱ्यात म्हणजे ह्यांच्या बरोबर का? अरे भुकेमुळं किती कासावीस झालीय ती. तिचं लेकरू. खरं बोलतेय ती. नाडी पाहिली आहे मी तिची. क्षीण झाली आहे अगदी.

**दत्तू** :- (अडखळत) तरी पण, भाऊ ह्यांना कसं चालेल -

**सत्यकाम** :- (तोडत) तिचा जीव महत्त्वाचा की पंगत?

**१ ला ब्राह्मण** :- (रागानं) ही. ही महारीण आमच्या पंगतीत बसणार?

**सत्यकाम** :- कोपऱ्यात बसवली आहे तिला. तिची सावलीसुद्धा तुमच्यावर पडणार नाही.

**२ रा ब्राह्मण** :- (चिडलेला) ते आम्हाला माहीत नाही. आम्हाला हे चालणार नाही. काय हो?

**३ रा ब्राह्मण** :- प्रश्नच नाही! आम्ही हा भ्रष्टाचार मुळीच खपवून घेणार नाही. तुमच्या वडिलांचे श्राद्ध आणि तुम्ही -

**४ था ब्राह्मण** :- (इतरांना) तरी मी तुम्हाला सांगत होतो की हा सत्यकाम आपल्यास महासुधारक म्हणवतो. त्याच्याकडे श्राद्धाला जायचं तर विचार करा.

**१ ला ब्राह्मण** :- आता आम्हाला काय कल्पना हा असं काही करील म्हणून!

**सत्यकाम** :- अहो मी काय मुद्दाम बोलावलं त्या भिकारीणीला? पण तिची ही अवस्था पाहून दया आली मला तिची. तीही माणूसच आहे ना?

**५ वा ब्राह्मण** :- एवढा कळवळा आला असेल तिचा तर तिलाच जेवू घाला, आमच्या वाटचं (इतरांना) चला हो.

**सत्यकाम** :- (हात जोडून) असं करू नका. रागावून जाऊ नका. मला आपला अपमान करायचा नाही.

**१ ला ब्राह्मण** :- (उपहासानं) वा. वा. हा आमचा मोठा मानच करीत आहात

आपण. काय हो, तुमच्या स्वर्गस्थ वडिलांना चालेल का हा भ्रष्टाचार? की तेहि होते तुमच्यासारखे सुधारक?

**सत्यकाम** :- एकनाथ महाराजांना तुम्ही सुधारक मानत असाल तर मग मीही-

**२ रा ब्राह्मण** :- (हेटाळणीनं) वा.वा.वा. कुठे तो संत महात्मा आणि कुठे तुम्ही? काही बरोबरी? धर्मबुडवे कुठचे!

**सत्यकाम** :- त्यांनीही श्राद्धाच्या दिवशी भिकाऱ्यांना भोजन दिलं होतं. ते होते का धर्मबुडवे?

**४ था ब्राह्मण** :- (ब्राह्मणांना) तरी मी तुम्हाला सांगत होतो की हे स्वतःला फार विद्वान समजतात. चार बुकं इंग्रजी का शिकली तर निघाले आपल्या सनातन धर्मात चुका काढायला.

**३ रा ब्राह्मण** :- (आश्चर्यानं) आपल्या सनातन धर्मात चुका? असं होईलंच कसं? प्रत्यक्ष वेदांवर आधारलेला धर्म - चूक?

**५ वा ब्राह्मण** :- आणि हे वेद कसे? तर प्रत्यक्ष परमेश्वराने निर्मिलेले.

**१ ला ब्राह्मण** :- तेच तर ह्यांना मान्य नाही.

**२ रा ब्राह्मण** :- (आश्चर्याने) मान्य नाही? वेद ईश्वराने सांगितले हे मान्य नाही? आश्चर्य आहे. मान्य तरी काय आहे मग ह्यांना?

**४ था ब्राह्मण** :- वेद ऋषींनी म्हणजेच विद्वान, संयमी अशा माणसांनीच लिहिले आंहेत. म्हणून कालमानाप्रमाणे त्यात योग्य बदल करण्यास हरकत नाही .. पाहिलंत? म्हणून तर मी तुम्हाला सांगत होतो-

**३ रा ब्राह्मण** :- (कुचेश्टेनं) तुम्ही वाचलं वाटतं ह्यांचं ते पुस्तक?

**४ था ब्राह्मण** :- (शरमून) छी. छी. मी कशाला वाचतो असं भ्रष्टाचार सांगणारं पुस्तक. नुसतं ऐकलं.

**२ रा ब्राह्मण** :- प्रत्यक्ष धर्मात बदल? अन् तोही मानवानं करायचा? अब्रम्हण्यम! केवढा हा भ्रष्टाचार! प्रत्यक्ष परमेश्वराची चूक काढणारा हा कोण मोठा - बाटगा!

**सत्यकाम** :- हे पहा मला बाटगा वगैरे म्हणायचं काही एक कारण नाही. तुमच्याइतकाच, नव्हे जास्तच अभिमान मला आपल्या सनातन धर्माचा आहे. पण दुराभिमान नाही.

**२ रा ब्राह्मण** :- (रागानं) म्हणजे आम्ही दुराभिमानी. मूर्ख आँणि तूच एक मोठा शहाणा - वा रे वा! म्हणे वेद ईश्वरानं निर्माण केले नाहीत.

**सत्यकाम** :- नाहीच! अतिशय चरित्रसंपन्न, निर्मोही व सामाजिक तसेच मानवी उन्नतीचा विचार करणाऱ्या निस्वार्थ ऋषिमुनींनी निर्माण केले आहेत ते.

**२ रा ब्राह्मण** :- (जिंकल्याच्या सुरात) हो ना? मग त्यांनी ठरविलेल्या धर्मात बदल कशासाठी? त्यांनी सांगितलेला धर्म चूक कसा असेल?अहो त्रिकालदर्शी तें!

**सत्यकाम** :- ते खरं. पण शेवटी ते ही माणसंच ना? त्यांची स्वाभाविक दृष्टी भविष्यात किती दूर पोहचणार? एखादे शतक पुढे. आजच्या परिस्थितीचे दर्शन त्यांना थोडेच होणार. म्हणून कालमानाप्रमाणे त्यांना त्या त्या वेळी जो धर्माचार योग्य वाटला तो त्यांनी सांगितला. आज तो ....

**४ था ब्राह्मण** :- धर्म बदला. भ्रष्टाचार करा, विधवाविवाह करा, विटाळचांडाळ मानू नका. साहेबांप्रमाणे प्यांटा घालून अभक्ष्यभक्षण करा. (३ ऱ्या ब्राह्मणाला) तरी मी तुम्हाला सांगत होतो -

**३ रा ब्राह्मण** :- तुम्ही काहीही करा पण सनातन धर्माप्रमाणेच आम्ही वागणार. विटाळचांडाळ मानणार -

**सत्यकाम** :- (हसून) तेच म्हणतो मी. आपल्या धर्मात विटाळ मानला आहे तो फक्त चांडाळांचा. शुद्र पुरुषापासून ब्राह्मण स्त्रीला झालेली संतती म्हणजे चांडाळ. बाकीचे सारे स्पृश्य.

**१ ला ब्राह्मण** :- (आढ्यतेने) हे संशोधन तुमचे वाटते?

**सत्यकाम** :- हो. मी वेद वेदांगे, इतिहास पुराणे यांचा अभ्यास करून ह्याच निष्कर्षाला आलो आहे. अशा स्त्री-पुरुषाला संतती समवेत समाज जीणं इतकं असह्य करी की असं काही करायला कुणी धजावतच नसे. म्हणूनच कालौघात ही जमातच जवळपास नाहीशी झाली.

**५ वा ब्राह्मण** :- म्हणजे आज आपण ज्यांचा विटाळ मानतो ते -

**सत्यकाम** :- ते कालौघात अस्पृश्य मानले गेले, त्यांच्या अस्वच्छ राहणीमुळे, मृत जनावरांच्या मांसाचे भक्षण करण्यामुळे. वास्तविक अस्पृश्यता

आपल्या धर्मात नाही.

**३ रा ब्राह्मण** :- अहो त्याचं काय ऐकता? कालचा पोर तो. धर्मग्रंथांचे अर्थ फिरवून काय वाटेल ते सिद्ध करेल.

**४ था ब्राह्मण** :- खुद्द श्रीमत् शंकराचार्यांचा अपमान करणारा हा सत्या -

**३ रा ब्राह्मण** :- काय? श्रींचा अपमान?

**४ था ब्राह्मण** :- मग सांगतो काय तर! म्हणे आद्य शंकराचार्य सुद्धा चुकले. वेदोपनिषदांचा अर्थ लावण्यात -

**१ ला ब्राह्मण** :- (तोडत) आता मात्र कहर झाला. मंडळी, निघा, आजपासून ह्याच्यावर आपण बहिष्कार टाकला आहे. ह्याच्याकडे धर्मकार्यच काय पण पाणीसुद्धा पिण्याची बंदी घालणारा ठराव ब्राह्मण सभेत मंजूर करून घेऊ. सत्यकामा आम्ही हा अपमान विसरणार नाही. चला हो.

**सत्यकाम** :- (हात जोडून) जशी आपली मर्जी. मी आपला अपमान व्हावा असं काही केलं असं मला वाटत नाही. याऊपर आपली मर्जी.

**दुसरा ब्राह्मण** :- पहा. पहा. याची उद्दामपणाची भाषा पहा.

**४ था ब्राह्मण** :- मी काय सांगत होतो मग?

**३ रा ब्राह्मण** :- चला मंडळी. कशाची वाट पाहता? (५ व्या ब्राह्मणाकडे पाहात) कसचा विचार करता?

**५ वा ब्राह्मण** :- त्यांच्या बोलण्यात विचार करण्यासारखं आहे. आपण त्यांना समजून घेतलं तर -

**१ ला ब्राह्मण** :- तुम्ही अडकले वाटतं ह्याच्या शब्द जंजाळात? की भोजनाचा मोह सुटत नाही?

**५ वा ब्राह्मण** :- तसं नाही. पण (धीर खचून) आपलंही बरोबर आहे. चलतो.

**भिकारीण** :- महाराज, माझ्यासाठी तुमी कायले बामनाईंचा राग अंगावर घेताजी. मी मंग खाईन.

**सत्यकाम** :- (ठामपणे) तू जेव. ते जेवतील नाही तर न जेवतील. तुला अन्नाची जास्त गरज आहे. (ब्राह्मणांना) पहा. पहा. त्या भिकारणीचं तरी मन पहा -

**सर्व ब्राह्मण** :- (आवेशानं) बस्स! आता कडेलोट झाला. चला मंडळी.

(तावातावात ४ ब्राह्मण निघून जातात. ५ वा ब्राम्हण एकवार सत्यकामाकडे पाहतो. नंतर नजर खाली करून जड पावलानं निघून जातो. मध्यभागी सत्यकाम ताठ उभा. भिकारीण बकाबका वाढलेले अन्न खात आहे. पोराला भरवत आहे. डोळे पुसत आहे. घरची इतर मंडळी स्तंभीत होऊन आळीपाळीनं सत्यकामाकडे व त्या भिकारिणीकडे पाहात आहेत. सत्यकामाच्या चेहऱ्यावर दया व समाधानाचे मिश्रण - अंधार)

**प्रवेश ७ वा**

(चित्रगुप्त, वकील व सत्यकाम - यांच्यावर पूर्वी प्रमाणेच स्पॉट)

**चित्रगुप्त** :- वकीला, या पाच ब्राह्मणापैकी सर्वात वृद्ध ब्राह्मणाला मी आपल्या दरबारात अलिकडेच पाहिलं असं मला आठवतं.

**वकील** :- बरोबर आहे महाराज. एका एकादशीला उपवासाचे पदार्थ खूप खाण्याचं निमित्त होऊन अलसक नावाच्या घातक अजीर्णानं त्याचा मृत्यु झाला.

**चित्रगुप्त** :- म्हणजे त्या ब्राह्मणानं अतिखादाडपणानं आपला मृत्यु ओढवून घेतला म्हणायचा (सत्यकाम हसतो) हसायला काय झालं रे सत्यकामा?

**सत्यकाम** :- क्षमा करा महाराज. हा स्वतः आयुर्वेदाचार्य होता. पण जीभेला आवर घालता आला नाही.

**वकील** :- त्याला तसा आवर घालता आला नाही आणि ह्याला बोलतांना स्वतःला आवर घालता आला नाही. ह्याच्या सत्यवादीपणाचा हा म्हातारा बळी झाला महाराज.

**चित्रगुप्त** :- हे काय नवीनच काढलं वकीला? सत्यवादीपणाचा बळी?

**वकील** :- होय महाराज. आपल्या औषधानं आपण बरे होत नाही हे पाहून तो बिचारा सारा विरोध सोडून ह्याच्याकडे आला. औषध घ्यायला.

**चित्रगुप्त** :- सत्यकामा, तू त्याला औषध दिलं?

**सत्यकाम** :- होय महाराज. तो एक आर्त रुग्ण म्हणून माझ्याकडे आला होता. त्याला औषध देणं माझं वैद्य म्हणून प्रथम कर्तव्य होतं.

**वकील** :- (हेटाळणीनं) औषध दिलं की त्याच्या मनाला जबरदस्त धक्का देऊन त्याचा बळी घेतला?

**चित्रगुप्त** :- तू हा परत परत काय आरोप करीत आहेस वकीला? काय झालं ते स्पष्ट सांग.

**वकील** :- ह्याच्या औषधोपचारानं देखील तो बरा होत नव्हता. काही दिवसांनी ह्यानी सांगून टाकलं की तुम्ही काही ह्या आजारातून उठत नाही. शेवटचा आजार आहे तुमचा.

**चित्रगुप्त** :- (आश्चर्यानं) असं सांगितलं? कमाल आहे. वैद्यानं रोग्याला असं सांगू नये असा नीतीनियम आहे.

**वकील** :- परिणाम काय झाला? तो बिचारा त्या धक्क्यानंच मेला.

**चित्रगुप्त** :- हे तू बरोबर केलं नाहीस सत्यकामा. अरे सत्य असलं तरी ते प्रत्यक्ष रोग्याला सांगणं वैद्याच्या व्यवसायनीतीला धरून होत नाही.

**सत्यकाम** :- हे मलाही माहीत आहे महाराज. मी त्याला सांगणार नव्हतोच. पण त्यानं माझ्याजवळ हट्टच धरला. म्हणाला मी एक वैद्य आहे. तुम्हीही होमिओपॅथीचे वैद्य आहात. तेव्हा मला वैद्य म्हणून खरं सांगा. मी काही एक मनावर घेणार नाही.

**वकील** :- (खवचटपणे) मग ह्या सत्याच्या अवतारानं सांगून टाकलं. आणि त्या म्हाताऱ्यानं मान टाकली.

**सत्यकाम** :- नाही. चूक आहे हे. उलट मीच त्याला विचारलं की नाडी परीक्षेवरून तुम्हाला काय वाटतं? तो म्हणाला माझे दिवस भरले असं वाटतं. तुमचं खरं मत सांगा.

**वकील** :- आणि ह्यांनी खरं खरं सांगितलं.

**सत्यकाम** :- काय करू मग? तो वैद्य होता आणि सत्य सांगा म्हटल्यावर माझा -

**वकील** :- नाईलाज झाला. वा. पण "सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात्" असंही वचन आहे महाराज.

**सत्यकाम** :- ते बरोबरच आहे. पण इथे लागू होत नाही. कारण त्यावर तो म्हातारा इतकंच म्हणाला की ठीक आहे. तरीपण तुमचं औषध चालू ठेवा. जे व्हायचं असेल ते होईल.

**चित्रगुप्त** :- म्हणजे त्याला धक्का वगैरे बसला नाही.

सत्यकाम :- मुळीच नाही. उलट शेवटपर्यंत तो माझंच औषध घेत राहिला. मी दुसरा वैद्य पहा असं सुचवून पाहिलं तरी.

चित्रगुप्त :- मग ती परिणामाची जबाबदारी तुझ्यावर मुळीच राहत नाही. असो. तर मूळ मुद्दा बाजूलाच राहिला. वकीला, ह्याच ब्राह्मणाचा न्यायनिवाडा करतांना तू त्याला पापी ठरवलं होतं. अस्पृश्यता पाळण्यामुळे! आठवतं?

वकील :- (वरमून) होय महाराज, अस्पृश्यता हिंदु धर्मात नाही हे खरंच. म्हणून मी त्या ब्राह्मणाला पापी ठरवलं.

चित्रगुप्त :- हो ना. मग?

वकील :- मला ह्या प्रसंगातून दाखवायचा आहे तो याचा सत्यावादीपणाच्या आवरणाखाली झाकलेला हट्टीपणा.

चित्रगुप्त :- हट्टीपणा? नवीनच आरोप दिसतो.

वकील :- ह्या हट्टीपणामुळे ह्यानं आपल्यावर तर संकट ओढवून घेतलेच पण साऱ्या कुटुंबालाही त्या खाईत लोटले.

चित्रगुप्त :- ते कसे काय?

वकील :- ह्याचा दुसरा मुलगा, तात्या काँग्रेसच्या असहकारितेच्या चळवळीत भाग घेऊन तुरुंगात गेला. जोडीला इंग्रज सरकारनं दंड ही केला.हट्टीपणानं तो भरण्यास ह्यानं नकार दिला. घरावर जप्ती आली. दंड वसूल करण्यासाठी. ह्याचे एक सहकारी माधवराव त्या दिवशी दुपारी ह्याच्याकडे गेले तर काय? ...(अंधार)

## प्रवेश ८ वा

(ओसरीवर मध्यम वयाचा सत्यकाम एका खुर्चीवर बसून कसल्यातरी जाड ग्रंथाचे वाचन करीत शांतपणे बसला आहे. दत्तू, मोठा मुलगा नीळकंठ (ह्याचा वेष डोक्यावर काळी गोल टोपी, शर्ट पँटमध्ये खोचलेला नवीन पीढीचा), आई, सावित्रीबाई वगैरे घरची मंडळी एका कोपऱ्यात उभे राहून सारा प्रकार हताश होऊन पाहात आहेत. कोर्टातले पट्टेवाले घरातले सर्व सामान एक एक करून बाहेर घेऊन जातांना दिसत आहेत. एक एक समान बाहेर नेत असतांना आई, सवित्रीबाईचा चेहरा

व्याकूळ होत आहे.)

माधवराव :- (वेष - धोतर, कोट, खादीची टोपी) भाऊजी हे काय चाललंय? काय प्रकार आहे हा?

सावित्री :- आमचं दुर्दैव. दुसरं काय? आमच्या घरावर जप्ती आलीय.

आई :- आणि या मेल्यांनी सगळं घर धुवून बैलगाडीत भरलं.

सावित्री :- खाटा, बिछाने तर जाऊ द्या पण वर्षभराचं धान्यसुद्धा ठेवलं नाही.

आई :- मेल्यांना सोवळं, ओवळं देखील नाही. माझे देव सुद्धा बुटांच्या पायांनी नेऊन विटाळलेत.

सत्यकाम :- (हसून) पहा आई. देवांनासुद्धा सोडलं ~~नाही~~ या इंग्रजांनी. मग माणसांची त्यांना काय पर्वा?

आई :- सत्यकामा, अरे थट्टा सुचते तरी कशी तुला अशा यावेळी?

सत्यकाम :- (कृत्रिम गंभीरपणे) सोन्या-चांदीचे देव नकोत असं मी म्हणूनच म्हणतो. उगीच चोराचं धन. पण ऐकतो कोण?

आई :- (रोषानं) माहीत आहे तू कसा आहेस ते - नास्तिक! (सत्यकाम परत हसतो) अरे सत्या हसणं सुचतं तरी कसं तुला या प्रसंगी?

सत्यकाम :- हसतो आपल्या दैवाला. अगं आई, तुझा नातू तात्या अन् मी एकचवेळी गेलो सत्याग्रहात. त्याला पकडलं सरकारनं आणि मला सोडून दिलं शहराबाहेर नेऊन. जंगलात.

सावित्री :- हो नं. पायी चालत घरी आल्यावर पाय सुजून गेले होते नुसते.

सत्यकाम :- हो ना. त्यापेक्षा मोटरीतून नेऊन तुरुंगात टाकलं असतं तर पाय सुजले असते का? अं?

सावित्री :- (रोषानं) असं म्हणायचं होतं वाटतं मला? अशी जीवघेणी थट्टा सुचते तरी कशी म्हणते मी - यावेळी.

माधवराव :- देवघरातले देव सुद्धा जप्त केले म्हणता? मग दागदागिने तर पहिल्यांदाच जप्त केले असतील त्यांनी.

मोठा मुलगा नीळकंठ :- (मिष्कीलपणे) त्यांची लाख इच्छा असेल हो. पण आमच्याकडे असायला हवे ना? आमच्या आईच्या गळ्यातली काळी पोत पाहून हताश झाले असतील बिचारे.

(इतक्यात एक पट्टेवाला पोत्यात भरून सारी भांडीकुंडी घेऊन जाऊ लागतो. दत्तू व सावित्री त्याला अडवत -)

**दत्तू** :- (आडवा होत) हे पहा पट्टेवाले, भांडी मी तुम्हाला नाही नेऊ देणार! तुम्हाला काही लाजलज्जा आहे की नाही?

**सत्यकाम** :- (जरबेनं) दत्तू, त्यांना त्यांचं काम करू दे. बाजूला हो. ते काय बिचारे - हुकुमाचे ताबेदार.

**दत्तू** :- ते काही नाही. मी प्रतिकार करणार! धान्य नेलंच आता भांडीही नेणार. मग शिजवायचं कशात आणि खायचं काय?

**सत्यकाम** :- पाहू पुढे.

**दत्तू** :- नाही. मी प्रतिकार करणार!

**सत्यकाम** :- मी करू देणार नाही. प्रतिकार करावयाचा नाही हे असहकाराचं तत्त्व! ते पाळणं माझा धर्म!

**दत्तू** :- तात्याला दंड अन् जप्ती आपल्या घरावर? दंड वसूल करायला?

**सत्यकाम** :- मीच सरकारला सांगितलं. मी दंड भरणार नाही. पैसे असले तरी.

**नीळकंठ** :- भाऊजी, पण हा जुलुम नाही का?

**सत्यकाम** :- (हसून) इंग्रज सरकारकडून दुसरी काय अपेक्षा?

**सावित्री** :- (विनवत) अहो पट्टेवाले तेवढी स्वयंपाकाची भांडी तरी राहू द्या.

**सत्यकाम** :- थांबा. त्याला विनवू नका. स्वयंपाक काय गाडग्यामडक्यात होत नाही? आणि जेवायला काय पत्रावळी किंवा केळीचं पान ठेवलं तर अन्नाचं विष होतं?

**आई** :- (रडवेल्या) आई जगदंबे वाचव गं बाई! कसं होणार आमचं?

**सत्यकाम** :- तिला कशाला ओढता यांत. गरीब शेतकरी, मजूर यांच्या घरी काय साठवलेले धान्य आणि पितळीची भांडी असतात? त्यांचा नाही संसार होत? जा रे बाबा तू आपलं काम कर.

(तो जातो. इतक्यात दुसरा पट्टेवाला शिजवलेले अन्नही घेऊन जाऊ लागतो. त्याला माधवराव अडवतात.)

**माधवराव** :- अरे मूर्खा! शिजवलेलं अन्नही घेऊन चाललास? तुला काही अक्कल आहे की नाही?

सत्यकाम :- ते माहीत नाही. पण पोट आहे. घरची मंडळी जेवतील त्याच्या - पोटभर.

सावित्री, आई एकदम:- आणि आपण?

सत्यकाम :- आपण काय रोजच जेवतो. जा रे बाबा. (तो जातो)

माधवराव :- भाऊजी, बाहेर बैलगाडीजवळ उभ्या असलेल्या पोलीस अधिकाऱ्याला विनंती करू का. शिजवलेला स्वयंपाक घेऊन जायचा म्हणजे कमाल झाली.

सत्यकाम :- (आवेशानं) इंग्रजसरकारच्या अधिकाऱ्याची विनवणी? मुळीच नाही. मी करणार नाही. तुम्हालाही करू देणार नाही.

माधवराव :- पण आजचं जेवण.

सत्यकाम :- आम्ही काही उपाशी राहात नाही. बाजारात जाऊन थोडंसं धान्य, पत्रावळी आणि चार दोन गाडगीमडकी विकत आणण्यापुरते पैसे आहेत माझ्याजवळ.

आई,सावित्री :- काय? गाडग्यामडक्यात अन्न शिजवायचं? आई गं.

सत्यकाम :- त्यात काय झालं? गरीबांकडे .....

माधवराव :- असंच करतात. (हात जोडून) धन्य आहे तुमची. भाऊजी माझी एवढी विनंती मान्य करा. आज आमच्याकडे जेवायला या. सारे जण. नाही म्हणू नका.

सत्यकाम :- सारेजण?

माधवराव :- काही जड जायचं नाही आम्हाला. आणि मी काही उपकार वगैरे म्हणून करीत नाही हे. एक शेजार धर्म.

सत्यकाम :- माधवराव, तुमचा स्वभाव आम्हाला माहीत का नाही? आणि खरा ब्राह्मण भोजनाच्या निमंत्रणाला नाही म्हणूच शकत नाही. पण तुम्ही मला ब्राह्मण समजता नं?

माधवराव :- कमाल केलीत हं भाऊजी. अहो तुम्हाला खरा ब्राह्मण न समजणारे -

नीळकंठ :- सनातनी! तुम्ही नाही. पण -

सत्यकाम :- पण आजची परिस्थिती वेगळी आहे. आज मी हतबल होऊन तुमच्याकडे जेवायला येऊ शकत नाही. क्षमा करा. मानानं येईन

पुढे. पण आज निश्चितच नाही.

माधवराव :- (सद्गदित) धन्य आहे भाऊजी तुमची आणि तुमच्या कुटुंबीयांची. केला जरी पोत बळेची खाली, ज्वाला तरी ती वरती उफाळे. (तेवढ्यात एक पट्टेवाला कोपऱ्यातला एक खोका तपासतो व तसाच ठेवून निघून जातो ते पाहून.)

नीळकंठ :- अरे हा खोका राहिला औषधाचा आणि पुस्तकांचा. (तो पट्टेवाल्या राहू द्या असे हाताने खुणावतो) काय? राहू द्या. भाऊजी!

सत्यकाम :- (हसत) अरे, त्या बापड्याला त्याचं मोल काय कळणार? त्याचं मोल फक्त आपल्यालाच.

माधवराव :- खरंच आहे. भाऊजी, येतो तर मी.

सत्यकाम :- यावे.

(माधवराव सद्गदित होऊन सत्यकामाचे चरणस्पर्श करतो व ओलावलेल्या डोळ्यांच्या कडा पुसत निघून जातो. सारे स्तब्ध. सत्यकाम पुन्हा पुस्तकात डोके खुपसतो - अंधार)

## प्रवेश ९ वा

(चित्रगुप्त, वकील, सत्यकाम व इतर सर्व देव. पहिल्या प्रवेशात दाखविल्या प्रमाणे पूर्ण दरबार प्रकाशात येतो.)

चित्रगुप्त :- (भारावलेला) सत्यकामा, धन्य आहेस तू. तुझ्यासारखा देशभक्त विरळाच.

वकील :- थांबा महाराज. एवढ्यात घाईनं निर्णय घेऊ नका. ह्यानं देशभक्ती केली खरी. पण परस्पर.

चित्रगुप्त :- परस्पर? म्हणजे?

वकील :- मी बुध्याच तो शब्द वापरला. परस्पर देशभक्ती. स्वतःला आच न लागू देता.

चित्रगुप्त :- जरा स्पष्ट करशील का?

वकील :- होय महाराज. काँग्रेसच्या असहकारितेच्या चळवळीत भाग घेऊन अनेक कार्यकर्ते तुरुंगात गेलेत. इंग्रजसरकारनं केलेला असह्य छळ सोसला त्यांनी. तेव्हा हा कुठं होता? - ऐन लढाईच्या वेळी

पिछाडीवर.

चित्रगुप्त :- हा अन् ह्याचा मुलगा तात्या गेले होते ना आंदोलनात. मघाशीच पाहिलं ना ते आपण?

वकील :- हो. पण पोलीसांनी ह्याला सोडलं. तेच निमित्त केलं ह्यानं. तात्या, एवढा भीमासारखा पहेलवान, हाडाचा सापळा होऊन तुरुंगातून सुटला. खडी फोडून फोडून. बॅरिस्टर अभ्यंकर, जनरल आवारी सारखे ह्याचे सहकारी गेले जेलमध्ये सत्याग्रह करून. पण हा बाहेर राहिला.

चित्रगुप्त :- सत्यकामा, खरं आहे हे?

सत्यकाम :- खरं आहे.

चित्रगुप्त :- (आश्चर्यानं) खरं आहे? तुझ्यासारखा एवढा देशभक्त - कडवा.

सत्यकाम :- पण शिस्तीचा सैनिक. मी प्रांतिक काँग्रेसचा खजिनदार होतो. आणि मला पक्षप्रमुखाचा आदेश होता. बाहेर राहून चळवळ चालू ठेवण्याचा.

वकील :- (हेटाळणीनं) ह्याला बरंच झालं. पडत्या फळाची आज्ञा. कातडी बचावून पुन्हा वर देशभक्ती! वा!

सत्यकाम :- (आवेशानं) काय बोलतोस तू वकीला? मी कातडीबचावू देशभक्त? महाराज, त्यावेळी तुरुंगात जाणं सोपं होतं. पण बाहेर राहून चळवळीच्या होमात एकसारख्या समिधा टाकत होमकुंड धगधगत ठेवणं चिकाटीचं, प्रयासाचं, संयमाचं काम होतं.

वकील :- ते काम करणारं दुसरं कुणी नव्हतं? तूच बरा सापडला पक्षप्रमुखांना.

चित्रगुप्त :- अरे ह्याच्या वयाकडे पाहून -

सत्यकाम :- तसं नव्हे महाराज, त्यांनी माझी निस्पृहता, प्रसिद्धीपराङ्मुखता, काटेकोरपणा पाहिला असावा. आणि असा खजीनदार बाहेर असावा असं त्यांनी ठरवलं असावं. म्हणून मला त्यांनी अशी कळकळीची विनंती केली.

वकील :- (उपरोधानं) आणि ती तू मान्य केलीस.

सत्यकाम :- एक शिस्तबद्ध, सच्चा देशभक्त म्हणून माझं ते कर्तव्यच होतं.

वकीलमहाशय, तुम्ही माझ्या ठिकाणी असता तर काय केलं असतं?

**वकील** :- (प्रश्न टाळत) पण मग देशाला स्वातंत्र्य मिळण्याची चिन्हे दिसू लागण्याच्या सुमारास तू राजकारण संन्यास कां घेतला? देशाप्रती हेच तुझं कर्तव्य वाटतं?

**चित्रगुप्त** :- काय? सत्यकामानं राजकारण संन्यास घेतला? कां?

**वकील** :- ते त्यालाच विचारा. मी तर असे म्हणीन की स्वातंत्र्य मिळाल्यावरच खरं म्हणजे अशा बुद्धिमान, देशप्रेमी व निस्पृह वगैरे वगैरे म्हणवणाऱ्यांची देशाला जास्त गरज होती. स्वराज्याचं सुराज्यात रूपांतर करण्यासाठी.

**चित्रगुप्त** :- अगदी बरोबर! अशा लोकांनी राजकारण संन्यास घेतल्यानं पुढे स्वार्थी, निर्लज्ज, लोभी पुढाऱ्यांचं फावलं आणि त्यांनी देशाला अधोगतीला नेण्यास कसर ठेवली नाही. हा इतिहास आहे.

**वकील** :- आणि म्हणूनच माझा ह्याच्यावर आरोप आहे. कर्तव्यच्युतीचा! देशाच्या आजच्या अधोगतीस हा आणि ह्याच्यासारखे अनेक कारणीभूत आहेत. अप्रत्यक्षपणे, हा बेजबाबदारीचा आरोप -

**चित्रगुप्त** :- फार गंभीर आहे आणि ह्याची शहानिशा फार काटेकोरपणे करावी लागेल. म्हणून मी आजची बैठक स्थगित करीत आहे. निवाडा करण्याचे काम उद्या पूर्ववत सुरू होईल. (उठतात)

(चित्रगुप्त उठतात. सर्व देव उठून उभे राहतात. चित्रगुप्त निघून जातात. इतर सर्व देव आपसात कुजबुजत असतात. वकीलाशी बोलू लागतात. सत्यकाम तसाच उभा. ताठ. निर्भय. चेहऱ्यावर स्मित. हळूहळू अंधार होत फक्त सत्यकामाच्या चेहऱ्यावर प्रकाश. हळूहळू पडदा सरकतो.)

**अंक १ ला समाप्त**

## अंक दुसरा

### (प्रवेश १ ला)

(चित्रगुप्ताचा दरबार. सर्व देव आपसात कुजबुजत असतात. वकील कसल्यातरी गंभीर विचारात हातातली कागदपत्र चाळत असतो. सत्यकाम कठड्यात शांतपणे बसलेला आहे. इतक्यात आतून ललकारी ऐकू येते. सर्व देव, वकील व सत्यकाम उठून उभे राहतात. चित्रगुप्त प्रवेश करतात. आपल्या आसनासमोर उभे राहतात. नंतर सर्वांना बसण्याची खूण करून स्वत: आसनावर बसतात.)

**चित्रगुप्त** :- (वकीलास) वकीलमहाशय, कालचा आरोप तुम्ही परत एकदा सत्यकामाला ऐकवा. म्हणजे खटल्याला पद्धतशीरपणे परत सुरुवात करता येईल.

**वकील** :- (मान लववून) जशी आपली आज्ञा. माझा पुढला आरोप आहे पळपुटेपणाचा, कर्तव्यच्युतीचा. देशाला स्वातंत्र्य मिळण्याची चिन्हे दिसू लागताच ह्याने राजकारण संन्यास घेतला. अशावेळी की ज्यावेळी स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करण्यासाठी अशा बुद्धिमान, देशभक्त व निस्पृह पुढाऱ्यांची देशाला गरज होती.

**चित्रगुप्त** :- बरोबर. म्हणूनच पुढे स्वार्थी, निर्लज्ज आणि लोभी पुढाऱ्यांचं फावलं आणि त्यांनी देशाला अधोगतीस नेलं. हा इतिहास आहे.

**वकील** :- (अतिशय गंभीरपणे) हे एक प्रकारचं पाप आहे महाराज. नुसता आरोप नाही. ह्या पापाला प्रायश्चित्त नाही.

**चित्रगुप्त** :- खरं आहे. सत्यकामा काय उत्तर आहे तुझं ह्यावर?

**सत्यकाम** :- (हसून) हा आरोप ठेवतांना वकीलमहाशयांनी मला सद्गुणी, निस्वार्थी व बुद्धिमान ठरवलं त्याबद्दल प्रथम मी त्यांचे आभार मानतो. महाराज, असा निर्णय घेण्यात माझा मुळीच स्वार्थ नव्हता.

**वकील** :- (तोडत) आरोप स्वार्थीपणाचा नाही, पळपुटेपणाचा. राजकारणातील धकाधकीचा कंटाळा येऊन ह्यानं कर्तव्यच्युती केली.

सत्यकाम :- (तोडत) कंटाळून नव्हे महाराज. राजकारण हा माझा पिंडच नव्हता. तरी मी राजकारणात उतरलो. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी. ती त्या काळाची प्राथमिक गरज होती. नव्हे प्रथम कर्तव्य होतं. लोकमान्य टिळकांनी नव्हतं का प्रथम राजकारण केलं.

वकील :- (उपहासानं) कुठे टिळक! कुठे हा - काही बरोबरी?

चित्रगुप्त :- (मध्येच) वकीला, चुकलास तू इथे. विद्वत्तेत हा काही कमी नव्हता. अरे, टिळकांनीच ह्याला विद्वद्रत्न ही पदवी देऊन ह्याचा गौरव केला होता. मला माहीत आहे ते.

सत्यकाम :- अशा लोकमान्यांनीच एकदा असं म्हटलं होतं की मी जर स्वतंत्र भारतात जन्मलो असतो तर मी कुठेतरी गणित व तत्वज्ञानाचा प्राध्यापक म्हणून आपल्या आवडीचे संशोधन करीत राहिलो असतो. राजकारण हा त्यांचाही पिंड नव्हता.

वकील :- (वरमून) ते ठीक आहे. पण ह्यानं राजकारण सोडून पुढं केलं काय महाराज तर समाजाच्या भावना दुखावल्या. त्यांच्या श्रद्धांना ठेच पोहचवली. धर्मग्रंथांचा, वेदांचा, उपनिषदांचा विपरीत अर्थ लावून समाजव्यवस्थेत ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली. प्रत्यक्ष श्रीमत् शंकराचार्यावर आरोप करण्यापर्यंत ह्याच्या उद्धटपणाची मजल गेली.

चित्रगुप्त :- (तोडत) प्रत्यक्ष शंकराचार्यांवर आरोप?

वकील :- (ठासून) हो. हो. प्रत्यक्ष शंकराचार्यांवर आरोप. आणि तोही खोटेपणाचा!

चित्रगुप्त :- (स्तंभीत) खोटेपणाचा? कमाल आहे.

वकील :- मग? सांगतो काय तर. खोटेपणाचा आरोप आणि तोही प्रत्यक्ष त्यांच्या तोंडावर.

चित्रगुप्त :- प्रत्यक्ष श्रींच्या तोंडावर? खरंच कळस केला ह्यानं. सांग वकीला, केव्हा घडला हा प्रसंग?

वकील :- (जोरदार भरदार आवाजात) वैशाख शुद्ध अष्टमी. रविवार दिनांक १५ सप्टेंबर १९४५. नागपुरातल्या टाऊनहॉल मधील श्रीमत् शंकराचार्यांची सभा. ती पहा आणि नंतर घरी हा

परतल्यावर घरच्या लोकांची उडालेली धांदल पहा. ह्याच्या एकेका प्रतापापायी बिचाऱ्यांना काय काय सोसावं लागलं. ते पहा.अंतर्ज्ञानानं. (चित्रगुप्त डोळे मिटतात. अंधार)

**प्रवेश २ रा**

(ओसरी. रात्री ८ चा सुमार. रातकिड्यांची किरकिर. कंदिलाच्या प्रकाशात आई कसलीतरी पोथी वाचत देवघरासमोर बसल्या आहेत. आता अधिकच थकलेल्या. सावित्री टकळीवर सूत कातत बसली आहे. ती चाळीशीकडे झुकलेली. आता मोठा झालेला सगळ्यात लहान मुलगा छोटू. पायजामा शर्टात. कसलं तरी पुस्तक वाचत दुसऱ्या कोपऱ्यात खुर्चीवर बसला आहे. स्टुलावर दुसरा कंदील. बाकी नीरव शांतता.)

**सावित्री** :- (अस्वस्थ. शेवटी शांतता असह्य होऊन) कोणत्या तरी सभेला गेले आहेत म्हणे हे.

**छोटू** :- (पुस्तकातून मान वर करीत) करवीरचे शंकराचार्य आले आहेत. त्यांच्या सभेला. खूप गर्दी झाली असणार टॉऊनहॉलमध्ये. धर्माचं प्रवचन ऐकायला मलाही जायचं होतं. पण भाऊजी म्हणाले आधी अभ्यास कर. परीक्षा जवळ आली.

**सावित्री** :- मला तर बाई भीती वाटायला लागली. रात्र झाली. (कुत्र्याचे दूरवर रडणे) अशुभ!

**छोटू** :- (हसत) अगं आई. कसली भीती अन् कसलं अशुभ? रात्री बेरात्री मारूतीसमोरच्या पटांगणात भाऊजी मधूनमधून जात असतात आकाशातले तारे बघायला. तेव्हा नाही वाटत तुला भीती?

**सावित्री** :- अरे ती गोष्ट वेगळी .

**छोटू** :- वेगळी? .. हो. हो. फारच वेगळी. (हसू लागतो. आई मान वर करतात.)

**सावित्री** :- हसायला काय झालं रे छोट्या? मेल्याला कशाचंही हसू येतं.

**छोटू** :- आई, झालंच तसं हसण्यासारखं परवा. मोठी आई तूच सांग ना ती परवाची गंमत. (हसू लागतो)

सावित्री :- परवा? म्हणजे मी मंदामावशीकडे आर्वीला गेली होती तेव्हा?

आई :- हो. तेव्हाच. अमावस्येच्या रात्री सत्या गेला होता त्या पटांगणात तारे पाहायला. नेहमीप्रमाणे. मध्यरात्री.

छोटू :- थंडीचे दिवस म्हणून अंगभर काळी कांबळी पांघरून आणि डोक्यावर काळी घोंगडीची टोपी.

सावित्री :- थंडी अजिबात सहन होत नाही ह्यांना. अशाच वेषात वावरतात सगळीकडे. लोक हसतात तर म्हणतात.

छोटू :- लोकांना हसायला काय होतंय. मला थंडी बाधते त्याला मी काय करू? कुठून आणू फॅशनेबल गरम कपडे - वुलनचे.

सावित्री :- (अधीरपणे) ते जाऊ दे. गंमत कसली?

छोटू :- अगं आई, त्याच वेळी एक तरुण स्त्री मारुतीला उलटया फेऱ्या मारून परत येत होती.

सावित्री :- आंबेकरीण असेल ती. तिला मूलबाळ नाही नं!

आई :- आंबेकरीणच होती ती. तिनं सत्याला पाहिलं अन् -

छोटू :- ती घाबरली. आधीच अमावस्येची काळी रात्र. काळाकुट्ट अंधार अन् कोपऱ्यात काळी आकृती हातवारे करतांना पाहून -

आई :- भूत भूत अशी ओरडत ती पळतच सुटली.

सावित्री :- आहे खरी गंमत! (हसते)

छोटू :- खरी गंमत तर पुढेच आहे. भाऊजींना वाटलं तिचा काहीतरी गैरसमज झाला आणि तो दूर करण्यासाठी ते तिच्यामागे धावत सुटले.

आई :- वर ओरडत होते - अहो बाई मी भूत नाही, भूत नाही, म्हणून. (सावित्रीला हसू कोसळते. थोडयावेळानं ते आवरून)

सावित्री :- कमालच केली ह्यांनी. एवढं कसं कळलं नाही ह्यांना. ह्यानं तर ती पुरती घाबरली असेल?

छोटू :- नुसती घाबरली? अगं आई, आपल्यामागे भूत लागलं ह्या कल्पनेनं ती बेशुद्धच पडली. आपल्या दारा समोरच.

आई :- सत्यानंच आम्हाला हाक मारून उठवलं.

छोटू :- दार उघडून आम्ही सारे पाहतो तो काय? ही बाई अशी

दारासमोरच बेशुद्ध होऊन पडलेली. तोंडाला फेस आलेला. अन् भाऊजी तिची नाडी धरून बसलेले. आम्ही तिला घरात आणलं.

आई :- मूल व्हावं म्हणून या बायका काय करतील काही सांगता येत नाही गं बाई.

छोटू :- त्यांना जे कोणी काय काय सांगेल ते ते.. औषध देऊन शुद्धीवर आणल्यावर भाऊजींनीच तिला तिच्या घरी पोहचवलं. एवढ्या रात्री! वर घरच्यांना उपदेश केला. दोघांचीही वैद्यकीय तपासणी करून घ्या म्हणाले.

आई :- तो परत आल्यावर मी सत्याला म्हणाले - अरे तू तिच्यामागे धावत सुटलास म्हणून ती जास्तच घाबरली बिचारी ... नाही घाबरणार?

छोट्या :- भाऊजी प्रथम खोखो हसले. मग एखाद्या लहान मुलासारखे निष्पाप उद्गारले, 'असं झालं का बेटं? लक्षात नाही आलं.'

सावित्री :- साध्या साध्या गोष्टी लक्षातच येत नाही ह्यांच्या. अगदी लहान मुलांसारखं वागतात कधी कधी.

छोटू :- अगं एवढे विद्वद्रत्न ते -

आई :- आपल्या विषयात! व्यवहार कळत नाही अगदी आणि खोटेपणा नाही सहन होत मुळीच. लगेच संतापानं लाल लाल होतो.

सावित्री :- (बाजू घेत) आता वय वाढलंय तसा राग थोडा कमी झालाय.

आई :- काही बाजू घेऊ नकोस त्याची. आई आहे मी त्याची. आता परवाचंच उदाहरण घे. त्या रोग्यावर किती जोरात खेकसले कुपथ्य केली अन् वर खोटं बोलला म्हणून. औषध देत नाही म्हणाले.

सावित्री :- (हसून) पण नंतर दिलं नं औषध. तो रोगी खोटं बोलणार नाही अशी शपथ घेऊन पाया पडल्यावर.

आई :- हो बाई. म्हणाला, मन आवरत नाही एखादे वेळी. खातं माणूस. पण खोटं कशाला सांगायचं? आडाखे चुकतात अशानं. पुन्हा खोटं बोलू नकोस.

छोटू :- (हसून) अगं मोठी आई, पूर्वीचे भाऊजी असते ना तर औषधच

बंद केलं असतं त्या रोग्याचं. मी लहान असतांना पाहिलं आहे ना त्यांना. बराच फरक पडलाय खरा स्वभावात.

(इतक्यात बाहेर गोंधळ ऐकू येतो. जोरजोरात बोलणे. सत्यकामाचे व त्यांच्या बरोबरच्या मंडळींचे. आवाज जवळ येतो. सत्यकामाला धरून तीनचारजण आत येतात. सत्यकाम आता वृद्धपणाकडे झुकलेला. कपाळावर खोक पडलेली. कपडे रक्तानं भरलेले. एक हात कपाळावर धरलेला. दुसऱ्या हातानं हातवारे चाललेले. बरोबर दत्तू अन् सत्यकामाचा मोठा मुलगा नीळकंठ. ह्याला सगळे बावाजी म्हणतात.)

**सावित्री** :- अगबाई काय झालं हे! कुठं पडले का! मारलं का कुणी?

**आई** :- काय केलंस रे बाबा? (दोघीही हुंदके देऊ लागतात.)

**छोटू** :- (हातात कंदील घेऊन उठतो) थांब आई. मी बघतो काय झालं ते.

(कंदीलाचा प्रकाश सत्यकामाच्या चेहऱ्यावर टाकत) काय झालं बावाजी?

**नीळकंठ** :- (सत्यकामाला खुर्चीवर बसवत) सांगतो. त्याचं काय झालं -

**सत्यकाम** :- (तोडत) ते नंतर. पहिले फेरमफॉस ह्या जखमेत भर.रक्त थांबवायला हवे पहिले. आणि बावा पोटात घ्यावयाची औषधं पण आण लवकर. तुला माहीत आहेत ती.

**गर्दीतला १ जण** :- भाऊजी डॉक्टरला बोलावू. रक्त थांबवण्यासाठी. टाके घालायचे असतील तर -

**सत्यकाम** :- डॉक्टर? अरे माझ्या फेरमफॉसची कमाल तर पहा. पांच मिनिटात रक्त थांबलं नाही तर ...

**नीळकंठ** :- (दटावल्यासारखं) भाऊजी आता जरा थांबता का बोलायचं. उगीच शक्तीपात. (नीळकंठ आत जाऊन औषध घेऊन येतो व ते जखमेत भरतो. वरून पट्टी बांधतो. पोटात औषध देतो. आई व सावित्रीचं मुसमुसणं चालूच. आतल्या खिडकी, दाराजवळ घरातली इतर मंडळी जमा झालेली अंधुक उजेडात दिसतात.)

**सत्यकाम** :- (त्यांना समजावत) झालं. थांबलं नं रक्त. आता थांबव रडणं.

एवढीशी खोक ती काय अन् त्यासाठी तुम्ही काळजी करता ती किती!

**सावित्री** :- हो. तुम्हाला काय होतं असं म्हणायला. इकडे आमचा जीव थाऱ्यावर नाही. अन् तुम्ही अशी उडवाउडव करता. तरीच माझा मेलीचा सकाळपासून डावा डोळा फडफडत होता.

**सत्यकाम** :- (हसतहसत) अस्सं! म्हणजे अपशकून झाला म्हणता काय? बरोबर! अगदी डाव्या कपाळावरच खोक पडली. पण डोळा वाचला. (हसू आवरत) अहो, लोक काय म्हणतील याचा तरी विचार करीत जा. शकून-अपशकून न मानणारा मी आणि त्यांचं कुटुंब हे असं -

**आई** :- (तोडत) ते जाऊ दे. लोकांना काय मेलं टवाळी करायला निमित्तच पाहिजे असते. पण आधी एक सांग. काय झालं सभेत? हाणामारी झाली का? दगड कसा लागला? की काठी लागली पोलिसाची? काय लोक असतात. शांतपणे श्रींचं भाषण सुद्धा ऐकून घेत नाहीत.

**दत्तू** :- अगं आई, लोकांना कशाला दोष देतेस? हे आपल्या सुपुत्राचंच काम.

**सावित्री** :- (आश्चर्यानं) ह्यांचं?

**नीळकंठ** :- मग? श्रींचं भाषण चालू होतं. लोक शांतपणे भक्तीभावानं ऐकत होते. श्री आपल्या धर्मातल्या अस्पृश्यतेवर बोलू लागले, शास्त्रार्थ सांगू लागले मात्र -

**दत्तू** :- भाऊजी ताडकन् उठले अन् ओरडले. श्री खोटं सांगत आहेत. शास्त्रार्थ असा नाही, ह्या प्रश्नावर दुसरी बाजू आहे. मी सांगतो.

**नीळकंठ** :- अन् निघाले गर्दीतून व्यासपीठावर.

**आई** :- (घाबरलेली) खरं कारे सत्यकामा?

**गर्दीतला १ जण** :- (उत्साहानं) अगदी खरंय मोठी आई. भाऊजी तार स्वरात ओरडत व्यासपीठाकडे निघाले. श्री, खरा शास्त्रार्थ मी सांगतो. आपल्या धर्मात अस्पृश्यता नाही. खरा शास्त्रार्थ तुम्हास कळला तरी नाही किंवा लपविता आहात लोकांपासून.

गर्दीतला २ रा :- असे म्हटल्यावर श्री भांबावले. चिडले. त्यांना नागपुरीं हे अपेक्षितच नव्हते. ते उठून जाऊ लागले.

गर्दीतला ३ रा :- तेव्हा सनातनी चिडले. भाऊजींना आवरू लागले. धक्काबुक्की करू लागले. सनातन्यांचा पुढारी तो पितळेशास्त्री. त्याने तर भाऊजींना धरूनच ठेवले.

गर्दीतला १ ला :- मग तर ह्यांना अधिकच जोर चढला. त्याची मिठी तोडून हे व्यासपीठाकडे धावले. त्यावरून हे बोलू लागले. असत्य काय म्हणून? मी माझे म्हणणे सिद्ध करतो. श्रींनी आपली बाजू सिद्ध करावी. सत्य काय ते लोकांसमोर येऊ द्या - भिता कशाला?

आई :- (आश्चर्यानं) काय? हा सत्या श्रींना भिता कशाला म्हणाला. काय केलंस रे सत्या हे?

सत्यकाम :- (निर्विकारपणे) त्यात काय झालं? श्री चुकू शकत नाहीत?

आई :- मग बरोबरच आहे. लोक चिडणार नाहीत तर काय ...

सत्यकाम :- अगं आई, आद्य शंकराचार्यांनी उपनिषदांचा अर्थ करतांना चूक केली. मायावाद व कर्मसंन्यासाचा पुरस्कार केला. तेच मला मान्य नाही तर हे कोण? त्यांचीच री ओढणारे त्यांचे उत्तराधिकारीच ना?

नीळकंठ :- मोठी आई, भाऊजी लोकांना सांगू लागले, की श्री सुद्धा मानवच आहेत. चुकू शकतात. आम्ही चर्चा करून ठरवितो खरा शास्त्रार्थ..

१ ला उत्साही:- असं भाऊजींनी म्हटलं मात्र श्री रागारागाने व्यासपीठ सोडून चालते झाले. मग सनातनी चवताळले. त्यांनी भाऊजींना दगड मारायला सुरूवात केली. तो पितळेशास्त्री सर्वात पुढे होता. त्यानेच पहिला दगड मारला -

सत्यकाम :- (हसत) आमच्या घोंगडीनं बचाव केला म्हटला आमचा. फक्त डोक्याला दगड लागला. त्या पितळे शास्त्र्याचा नेम काही चांगला नाही बेट्याचा -

सावित्री :- (रोषानं) मेली थट्टा तरी कशी सुचते म्हणते मी अशावेळी -

नीळकंठ :- थट्टा? अगं आई तिथंही ह्यांना थट्टा सुचली. धक्काबुक्कीतं यांची टोपी खाली पडली. मी शोधायला लागलो तर म्हणाले राहू दे.

डोकं ठिकाणावर आहे ना माझं, टोप्या काय पुष्कळ मिळतील.

**दत्तू** :- श्रींना प्रथम थट्टाच वाटली असेल. पण नंतर त्यांना दिसला नागपुरी हिसका-

**आई** :- अरे, त्यांना कसला बसणार आहे हिसका? ते जातील निघून. पण त्रास भोगावा लागेल आपल्याला. मागचं ते बहिष्कार प्रकरण नुकतंच जरा निवळू लागलं होतं .. तेव्हा त्या भिकारणीचे जेवण, आता श्रींचा अपमान. तो पितळे शास्त्री आता सूड घेणार मेला.

**सत्यकाम** :- (ठासून) अपमान कसला? खरा शास्त्रार्थ करा म्हणणं म्हणजे अपमान? सत्याचा आग्रह म्हणजे अगाऊपणा? मग वागायचं कसं? खोटा धर्म पाळत बसायचं?

**नीळकंठ** :- (धाडसानं) पण भाऊजी, आपण अस्पृश्यता पाळायची नाही - एक मानवधर्म म्हणून. मग ती आपल्या धर्मात असो किंवा नसो. आज ती अयोग्य आहे ना. झालं तर मग. कशाला त्या जुन्या पोथ्यात शोधत बसायचं?

**सत्यकाम** :- (उठून फेऱ्या घालत गंभीर आवाजात) बावा, तसं तुझं म्हणणं बरोबरच आहे. आपण आज योग्य तेच पाळायला पाहिजे. पण अस्पृश्यता आपल्या धर्मात नसतांना ती आहे म्हणणं म्हणजे आपल्या एवढ्या विवेकवादी, तर्कनिष्ठ अन् वास्तववादी वैदिक धर्माचा अपमान नाही का? अरे आपल्या खऱ्या वैदिकधर्माला लागलेली मायावादाची, अंधश्रद्धेची, कर्मसंन्यासाची काजळी पुसून टाकली तर तो ग्रहण सुटलेल्या सूर्यासारखा विश्वात तळपू लागेल. विश्वाचा मानव धर्म होण्याच्या लायकीचा हा वैदिक धर्म, मला लोकांना सांगितलाच पाहिजे. त्यासाठी वाटेल ते सोसायला मी तयार आहे. (भावनावेगाने आकाशाकडे पाहात उभे राहतात)

**नीळकंठ** :- (विचार करीत) पण भाऊजी शास्त्रार्थ करतांना तुमचीही चूक होऊ शकत नाही का?

**सत्यकाम** :- बावा, होऊ शकते. म्हणून तर मी चर्चा करायला, वाद घालायला

तयार असतो. विचारमंथनातून सत्य काय ते बाहेर यावं म्हणून - पण आपले लोक मला -

२ रा उत्साही :- (रागावून) वितंडवादी म्हणतात. भाऊजींना भांडखोर, घमेंडी, पापाचारी आणि नास्तिक म्हणतात. समाजात भ्रष्टाचार कालवणारा.

सत्यकाम :- (ठामपणे) म्हणू देत! मी भीक घालत नाही त्यांना आणि भीतही नाही. रात्र फार झाली. आता कृपाकरून चलावं सगळ्यांनी. माझी झोपायची वेळ झाली. साऱ्यांनी स्वस्थ झोपावं. मला काही एक झालं नाही. थोडी जखमेची कसर आहे. बस्स. (आत निघून जातात. लोक हळू आवाजात कुजबुजत जाऊ लागतात. छोटू, दत्तू, नीळकंठ आपसात हळू आवाजात बोलत असतांनाच -- अंधार )

## प्रवेश ३ रा

(चित्रगुप्ताचा पूर्ण दरबार प्रकाशात येतो. सर्व देव आपसात कुजबुजत आहेत.)

वकील :- तर हे असं आहे महाराज. मीच तेवढा खरा. बाकीचे सारे खोटे, लबाड किंवा ढोंगी. आपलाच हेका चालविण्यासाठी ह्यांनी इतर लोकांनाच नव्हे तर प्रत्यक्ष आपल्या पोरालाही दुखावलं.

चित्रगुप्त :- प्रत्यक्ष पोटच्या पोराला? कुणाला?

वकील :- नीळकंठाला! हा ह्याचा पहिला मुलगा बालपणापासून अतिशय बुद्धिमान. मोठेपणी एल्.एम.पी. डॉक्टर झाला. पण ह्यानं त्याला ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करू दिली नाही.

चित्रगुप्त :- (आश्चर्यानं) का बरं? चांगले दिवस आले असते सगळ्यांना.

वकील :- रोजची वादावादी. ॲलोपॅथी ही समूळ रोगहरणाची खरी चिकित्सा नाही. होमिओपॅथीच समूळ रोगहरण करून दुसरा रोग उत्पन्न करीत नाही. म्हणून हीच रोगहरणाची खरी चिकित्सा.

चित्रगुप्त :- वकीला, काय सांगतोस काय? इंग्रज परकीय म्हणून त्यांच्या विरूद्ध लढणे, ठीक. पण म्हणून त्यांनी शोधून काढलेले औषधी शास्त्रही चूक म्हणणे हे केवढे धाष्टर्य! अरे शास्त्रात कसलं

आलं आहे स्वकीय-परकीय? खरं ते खरं.

**वकील** :- आता तुम्हीच पहा म्हणजे झालं. असहकाराच्या आंदोलनात ह्यानं वकीली सोडून होमिओपॅथीची प्रॅक्टीस सुरू केली. उपजिवीका म्हणून. ते ठीक आहे. पण इथंही ह्याचा हटवाद आडवा आला. म्हणे होमिओपॅथीच खरी, श्रेष्ठ चिकित्सा, इतर पॅथी अपघातानं रोग दुरुस्त करणाऱ्या, एक रोग दाबून दुसरा घातक रोग उत्पन्न करणाऱ्या किंवा रोग्याला तात्पुरतं दुरुस्त करणाऱ्या - आता बोला.

**चित्रगुप्त** :- काय बोलायचं ते त्याला बोलू दे. सत्यकामा, तुझी मतं जर इतकी ठाम होती तर तू आपल्या मुलाला नीळकंठाला ॲलोपॅथीचं शिक्षण दिलंच कसं?

**सत्यकाम** :- प्रत्येकाला आपापला विषय निवडण्याचं स्वातंत्र्य आहे महाराज. त्यानं ॲलोपॅथीचं शिक्षण घ्यायचं ठरवलं. मी कोण अडवणार? शिवाय -

**चित्रगुप्त** :- शिवाय काय? त्याला डॉक्टर बनवून तुलाही खोऱ्यानं पैसा ओढायचा होता वाटतं.

**सत्यकाम** :- महाराज, पैशाचा, संपत्तीचा मोह मला कधीच नव्हता. हे तुम्हाला अन् ह्या वकीलाला मनातून पटले आहे. त्यांनी माझ्यावर इतके आरोप केले पण हा आरोप तो करू शकला नाही.

**चित्रगुप्त** :- अरे पण दारिद्याला कंटाळून शेवटी मानव हार खातोच. अन् त्यात अनैसर्गिक काहीच नाही. संसारात तरून जाण्यासाठी लक्ष्मीची कृपा हवीच ना?

**सत्यकाम** :- (तोडत) बस्स! केवळ तरून जाण्यासाठीच! चैनीत राहण्यासाठी नव्हे. त्यामुळे मनुष्य मोहात रूतत जातो अन् अंती दुःखीच होतो. वासनातृप्ती हे शाश्वत सुख नव्हे हे मी उपनिषदांच्या केलेल्या अर्थात दाखवून दिलेच आहे.

**चित्रगुप्त** :- (उत्सुकतेनं) पण आद्य शंकराचार्यांचा मायावाद तर तुला मान्य नाही.

**सत्यकाम** :- नाहीच! असा अर्थ त्यांनी उपनिषदांवर भाष्य करतांना ओढून

ताणून आणला असा माझा त्यांच्यावर आरोप आहे.

चित्रगुप्त :- ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या - हे तुला मान्य नाही तर तुला मान्य तरी काय आहे?

सत्यकाम :- महाराज, ब्रह्म सत्य असेल तर त्यापासून निर्माण झालेले जगही सत्यच आहे. सत्यापासून मिथ्या कसं उत्पन्न होऊ शकेल?

चित्रगुप्त :- अरे! सूर्य सत्य असला तरी त्याचं आरशात पडलेलं प्रतिबिंब भ्रामकच नाही का? ते सूर्यासारखं तापदायकही नाही की जाळतही नाही.

सत्यकाम :- जग असं भ्रामक नाही. जग हे काचेच्या भिंगातून (लेन्समधून) कागदावर पडणाऱ्या सूर्याच्या बिंबाप्रमाणे खरं आहे. ते कागदाला जाळते. तसेच ब्रह्मापासून उत्पन्न झालेला जीव ही ब्रह्माची प्रतिकृतीच आहे. खरीखुरी.

चित्रगुप्त :- पण जीव क्षणभंगूर आहे.

सत्यकाम :- वैयक्तिक जीव क्षणभंगूर असेल. पण जीवावस्था नित्य आहे. आणि मायावादाचा मी कडवा विरोध केला कारण त्या अनुषंगानं येणारा कर्मसंन्यास, ऐहिक जीवनाविषयी येणारी उदासीनता, व त्यामुळे भारताची झालेली अवनती, आलेलं पारतंत्र्य, निष्क्रियता, महाराज विषय फार मोठा आहे. माझ्या ग्रंथात मी ह्याचं सखोल विवरण केलं आहे.

चित्रगुप्त :- मी तो वाचून काढीनच. पण मनुष्याचे खरे धर्माचरण कसे असावे हे तू थोडक्यात सांगू शकतो?

सत्यकाम :- होय महाराज. मी तशी कविताच केलेली आहे. तीच म्हणून दाखवितो -

पुसे गुरुला नत शिष्यवर्य। सांगा मला भागवतीय कार्य।
बोले गुरु ईश्वर सर्वभूती। वसे, असे ठेवि सदैव चित्ती।
सर्वाहि भूतास सदा नमावे। कोणा विना हेतु न दुःख द्यावे।
प्रेमा जसा ठेविसि आत्मजीवी। त्या अन्य जीवीहि तसाच ठेवी।
सदा स्वकष्टार्जित अन्न खावे। उरेल ते दीन जनास द्यावे।
त्या दुःखिता सोडविण्या झटावे। स्वकीय जीवासहि त्या त्यजावे।

न चित्त तूझे विषयीं रमावे । परोपकारीच निमग्न व्हावे ।
दुःखी, सुखी चित्त समान राहो । होईल येणे परमार्थ लाहो ।
महाराज, ह्याप्रमाणे खरे धर्माचरण करणाऱ्याला आत्यंतिक सुखाची प्राप्ति ईह-परलोकी होईलच अशी माझी खात्री आहे.

**चित्रगुप्त** :- वा! खरं आहे. पण मूळ मुद्दा बाजूलाच राहिला.

**वकील** :- मी तेच म्हणतो. तू नीळकंठाला ॲलोपॅथीचा डॉक्टर केलं मग प्रॅक्टीस का करू दिली नाहीस? त्याला त्यावेळी काय वाटलं असेल? हेचि फळ काय मम तपाला? असं वाटलं असेल त्याला.

**सत्यकाम** :- महाराज, तो जेव्हा ॲलोपॅथीचा अभ्यास करीत होता. त्यावेळी मीही ॲलोपॅथीसकट इतर आठ पॅथीचाही अभ्यास करीत होतो. जोपर्यंत मी निष्कर्षाला आलो तोपर्यंत तो डॉक्टर होऊन प्रॅक्टीसही करू लागला होता. इतरांशी याबाबतीत जसे माझे वाद झाले तसेच ह्याच्याशीही झाले. आणि त्याला जेव्हा माझं मत पटलं -

**वकील** :- (उपहासानं) तेव्हा एवढी जोरात चालू असलेली प्रॅक्टीस सोडून देऊन त्यानं होमिओपॅथीची भिकारडी प्रॅक्टीस सुरू केली असंच ना? वा. कोण विश्वास ठेवील ह्या गोष्टीवर?

**चित्रगुप्त** :- वकीला, मग तुझा आरोप तरी काय आहे आता?

**वकील** :- माझा असा आरोप आहे की ह्यानं आपल्या मुलावर दबाव आणला.

**सत्यकाम** :- त्याला समचिकित्सा हीच खरी चिकित्सा हे मनापासून पटलं होतं महाराज. माझा लाडका नीळकंठ. अतिशय तल्लख बुद्धीचा, प्रसंगी माझ्याशीही वाद घालण्यास कमी न करणारा, सत्यप्रिय होता. त्याच्या शेवटच्या आजारात त्यानं आपलं औषध काम करीत नाही हे पाहिल्यावर इतर पॅथीचं औषध घेण्यास नकार दिला हे काय दबाव आणण्याचं उदाहरण आहे काय? उलट-

**वकील** :- उलट काय? तो आनंदानं मरायला तयार झाला?

**सत्यकाम** :- तसं कोण होतं? पण शरीराची प्रतिकार शक्तीच नष्ट झाल्यावर कोणतं औषध काम करणार असं त्यानं विचारलं.

**वकील** :- तरी ह्यानं जबरदस्तीनं दुसरं औषध दिलं असतं तर तो वाचला

नसता कशावरून? जनरीतच आहे तशी. पण ह्यानं तसं केलं नाही. शेवटी ह्याच्या डोळयासमोर नीळकंठाचा मृत्यू झाला. अप्रत्यक्षपणे, हा आपल्या मुलाचा मारेकरी आहे महाराज, याच्या हट्टाचा बळी!

**चित्रगुप्त** :- (रागानं) सत्यकामा खरं आहे हे?

**सत्यकाम** :- (दुःखानं) महाराज, हा आरोप ठेवून तुम्ही माझ्या दुःखावर डागण्याच देत आहात. माझ्या वृद्धपणी माझ्याच कार्यात हातभार लावणारा माझा नीळकंठ, याचा मी मारेकरी! हरहर (डोळे टिपतो)

**चित्रगुप्त** :- वकीला, नीळकंठ इथेच असेल ना? स्वर्गात?

**वकील** :- होय महाराज.

**चित्रगुप्त** :- मग त्याचीच साक्ष काढतो. कोण आहे रे तिकडे. त्या नीळकंठाला घेऊन या. (दोन देवदूत जातात.)

(वातावरणात स्तब्धता. वकील महाशय कागदपत्र चाळत इतर देवांशी बोलत असतात. चित्रगुप्ताशी कानगोष्टी करतात. इतक्यात देवदूत नीळकंठाला घेऊन येतात. फुलपँट, खोचलेला शर्ट, कोट, डोक्यावर काळी गोल टोपी अशा वेषांत नीळकंठ येतो. सत्यकामाला पाहून भाऊजी असं उद्‌गारून वंदन करतो. त्याला साक्षीदाराच्या कठड्यात देवदूत उभे करतात. चित्रगुप्त व वकील त्याच्याकडे काहीवेळ रोखून पाहतात.)

**वकील** :- (खाकरत) नीळकंठा, कसं चाललं आहे तुझं स्वर्गात? मजेत?

**नीळकंठ** :- तसं मजेतच म्हणायचं, अमृत आहे, सुंदर अप्सरा आहेत, यक्षकिन्नराचं गायन वादन आहे. पण -

**वकील** :- पण काय? काही उणीव?

**नीळकंठ** :- करमत नाही. इथं काही रोगराई नाही ना. कामच नाही माझ्यासारख्या डॉक्टराला. मरणच नाही. ज्याचं पुण्य संपलं तो तडक मृत्युलोकात परत. काय करायचं मग?

**वकील** :- अप्सरांचं नर्तन बघायचं. यक्षकिन्नराचं गायन ऐकायचं, गोड गोड अमृत सेवन करायचं.

नीळकंठ :- कंटाळा आला बुवा ते अमृत पिऊन. पृथ्वीवरच्या चहाची काही सर येत नाही तुमच्या त्या अमृताला (जीभ चावून) क्षमा करा भाऊजी पण मी चहा पीत असे तुमच्या चोरून - आम्ही सगळेच.

सत्यकाम :- (मंदस्मित) मला माहीत होतं. पण मी दाखवलं नाही.

नीळकंठ :- पण तुम्हाला माहीत नसेल भाऊजी की मी मोठा झाल्यावर नाटकं, सिनेमा पाहात होतो.

सत्यकाम :- तुझं कुटुंब मध्यम वयातच निर्वतल्यावर तू नाटक सिनेमा पहायला लागला. वेळ जावा म्हणून. साहजिकच होतं ते.

नीळकंठ :- मुलांसाठी मी दुसरं लग्न केलं नाही. मग कधी कधी -

सत्यकाम :- हे तुझं मोठेपण. फार थोडे असं करतात पोरा.

नीळकंठ :- (विषय बदलण्यासाठी) भाऊजी तुम्ही अगदी माझ्या पाठोपाठ इथे आलात.

सत्यकाम :- (हसून) अरे वितंडवाद करायला तुझ्यासारखा कोण उरलं होतं तिथे आता. आलो झालं निघून.

चित्रगुप्त :- (जरबेनं) हे पहा नीळकंठ, तुला आम्ही इथं बोलावलं ते तुला तुझ्या वडिलांशी गप्पागोष्टी करायला मिळाव्या म्हणून नाही.

नीळकंठ :- (हसून) महाराज, आम्ही नुसत्या गप्पागोष्टी कधी केल्याच नाही. आमचे वाद व्हायचे. वाद. कडाक्याचे.

वकील :- महाराज, कडाक्याचे म्हणजे किती? एकदातर शेजारपाजारचे शेजारी गोळा झाले. घरगुती भांडण समजून गंमत बघायला. समजूत घालायला.

चित्रगुप्त :- (अतिशय उत्सुकतेनं) अस्सं! असा कोणता वाद चालला होता? एवढा कडाक्याचा.

वकील :- भारतातील पराकोटीची आर्थिक विषमता कशी कमी होईल?

चित्रगुप्त :- विषय तर खरोखरच गंभीर आहे. सत्यकामा, तू उपाय तरी काय सुचवला होता त्यावर?

सत्यकाम :- आर्थिक विषमतेची दरी कमी करण्यासाठी सर्व धन राष्ट्राच्या मालकीचे करावे आणि राष्ट्राने प्रत्येक नागरिकाला त्याच्या शक्तीनुसार व आवडीनुसार काम द्यावे. तसेच त्याच्या गरजेनुसार

पुरेसे धन त्याला द्यावे. धनाचे अमर्याद व्यक्तिस्वामित्व हेच सामाजिक कलहाचे, चोऱ्या, खून, दरवडे, लाचलुचपत, भ्रष्टाचार इत्यादिकांचे मूळ आहे महाराज.

**चित्रगुप्त** :- नीळकंठ, ह्यावर तुझा काय आक्षेप आहे?

**नीळकंठ** :- (जोरात) ह्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा येईल. तिचा विकास होणार नाही. मनुष्य काही केवळ भाकरीवर जगत नाही महाराज. त्याला इतरही भुका असतात. तो असा गुलाम झाला तर त्याचा विकासच खुंटून जाईल.

**चित्रगुप्त** :- हेही बरोबरच आहे.

**सत्यकाम** :- म्हणूनच मी हे केवळ आर्थिक स्वातंत्र्यापुरतंच मर्यादित करावं असं म्हटलं. व्यक्तीचे भाषणस्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, कुटुंब व्यवस्था यात शासनाने मुळीच ढवळाढवळ करू नये. मर्यादा घालू नये.

**नीळकंठ** :- (हेटाळणीनं) असं होऊच शकत नाही. एकदा का तुम्ही सरकारला अधिकार दिले की स्वातंत्र्य गेलंच व्यक्तीचं. आता हिंदुकोड बिलाचंच पहा ना. वडिलांच्या संपत्तीत मुलाइतकाच मुलीलाही समान वाटा मिळावा ही ढवळाढवळ सरकारनं केलीच की नाही? बोला. भांडण लावून दिली की नाही कुटुंबात?

**सत्यकाम** :- (आवेशात) असा कसा रे तू बाबा? अरे, मी म्हणतो तशी राष्ट्र स्वामित्वाची पद्धत स्थापित झाली आहे का? त्यावेळी हा प्रश्नच येणार नाही -

**वकील** :- (तोडत) अशी यांची वादावादी चालायची. इस्टेट, वाटण्या, समान भाग वगैरे शब्द ऐकून शेजाऱ्यांना वाटलं की ह्यांचे इष्टेटीवरून भांडण चालू आहे. या नीळकंठानं तर मूठ टेबलवर आदळून आदळून तो मोडून टाकला.

**नीळकंठ** :- (हसून) उधईनं आधीच पोखरून पोकळ करून टाकला होता तो. पण शेजाऱ्यांचं मला नवल वाटतं. अजूनही. आमच्या घरी अशी इष्टेटच होती किती? वाटण्या करायला. घराचं एकएक कौल आलं असतं वाटयाला - (हसू लागतो)

वकील :- (तोडत) अरे पण तुम्ही तावातावानं अन् किती मोठमोठ्यानं भांडत - नव्हे वादत होता की त्या बिचाऱ्यांचा तसा गैरसमज होणं साहजिकच होतं.

सत्यकाम :- (हसत) खरं आहे बुवा. आवाज थोडा जास्तच वाढायचा आमचा. वाद घालताना. पुन्हा या बावाचा आवाज अगदी ढाण्या वाघासारखा - ऐकता आहाच ना तुम्ही?

वकील :- पुन्हा रूळावरून गाडी घसरतेय महाराज. आपण नीळकंठाची साक्ष काढायला बोलावलंय. वेळ फार थोडा आहे.

चित्रगुप्त :- वेळ थोडा आहे म्हणजे?

वकील :- या नीळकंठाचे इथले दिवस संपत आले आहे महाराज. कोणत्याही क्षणी ह्याला पृथ्वीवर परत जावे लागेल.

नीळकंठ :- अरे वा. म्हणजे इतिहासाची पुनरावृत्ती इथेही होते म्हणायची. वडिलांच्या आधी मुलगा जाणार -

चित्रगुप्त :- तो इतिहास तुझ्या वडिलांनीच घडवून आणला पृथ्वीवर. आपल्या हेकेखोर स्वभावानं. (चाचरत) म्हणजे असा आरोप आहे वकीलाचा तुझ्या वडिलांवर.

वकील :- आणि तशी साक्ष द्यावी म्हणून आम्ही तुला बोलावलंय. सांग. ह्याने तुला शेवटच्या आजारात दुसरं औषध - म्हणजे इतर पॅथीचं औषध घेऊ दिलं नाही ना? खरं सांग, घाबरू नकोस. (नीळकंठ हसत सुटतो) हसू नकोस. वेळ होतोय.

नीळकंठ :- (मोठ्या मुष्कीलीनं हसू आवरून) आता हसू नको तर काय करू? माझ्यावर आणि जबरदस्ती? कमाल केलीत तुम्ही. मी काय बोळयानं दूध पीत होतो काय महाराज? अहो ज्या ज्या विषयात, मग ते सामाजिक असोत, राजकीय असोत की वैद्यकीय असोत, माझे त्यांच्याशी वाद झाले आहेत. त्या त्या विषयात मला जे पटले तसाच मी वागलो आहे. तीव्र रोगात क्वचित प्रसंगी विषम चिकित्सा, शस्त्रक्रियाही करावी लागते हे मीच त्यांना पटवून दिलं. काय भाऊजी?

सत्यकाम :- खरं आहे बावा. समचिकित्सेला वेळ मिळावयास हवा म्हणून,

रोग्याचे प्राण वाचवण्यासाठी - पण यांना पटत नाही. त्यांना वाटतं मी तुझा अप्रत्यक्ष मारेकरी -

नीळकंठ :- (एकदम संतापून) काय मारेकरी? कोण तुम्ही? कोण म्हणतो? हे ऐकून कसं घेता तुम्ही? (वकीलास) काय हो? लायकी काय तुमची या विषयात? कोणत्याही विषयात तुम्ही अक्कल पाजळता.

वकील :- (वरमून) नाही. म्हणजे आम्हाला तुमचं म्हणणं ऐकायचं आहे या विषयी.

नीळकंठ :- घ्या तर मग लिहून. माझी अभ्यासानं व अनुभवानं पूर्ण खात्री झाली आहे की अनेक साध्य व दुःसाध्य रोगाला, दुसरा रोग उत्पन्न न करता, समूळ नाहीसा करणारी खरी चिकित्सा होमिओपॅथीच आहे. आणि बाराक्षार चिकित्सा ही सुलभ समचिकित्साच आहे.

वकील :- ते ठीक आहे. पण आमचं म्हणणं इतकंच की शेवटच्या आजारात -

नीळकंठ :- वकील महाशय, तुम्ही नीट ऐकलं नाही माझं म्हणणं. अहो हे विधान मी साध्य रोगाबद्दल केलंय, असाध्य रोगाबद्दल नाही. (मिष्कीलपणे) अहो असाध्य रोग तर तुमचा रामबाण आहे. मृत्युलोकातून मानवाला परत आणायचा. तोच मला झाल्यावर मला कोणचं दुसरं औषध तारणार होतं?

वकील :- पण मी म्हणतो काय हरकत होती? नाहीतरी तुझं औषध काम करीत नव्हतंच.

नीळकंठ :- वा. वा. तुम्ही तर कमालच करता वकील महाशय. अहो आयुष्यभर होमिओपॅथी हीच खरी चिकित्सा असा प्रचार करणारा मी मृत्यूला भिऊन शेवटच्या समयाला तोंडाला काळोखी फासून घेऊ काय? (वैतागानं) हूं! म्हणे वडिलांनी जबरदस्ती केली.

चित्रगुप्त :- (कौतुकानं) आहे खरा बापसे बेटा सवाई! कौतुक वाटतं मला तुझं.

नीळकंठ :- कौतुक कसलं करता महाराज. असाध्य रोग आहेत म्हणूनच बरं आहे. नाहीतर मृत्युलोकात पाय ठेवायला जागा नसती

राहिली माणसांना. (हसत) भाऊजी, हे तुमचं मत बरं का.
(चित्रगुप्ताच्या कानात एक दूत कुजबुजतो. ते ऐकून)

चित्रगुप्त :- खरं आहे. त्याच मृत्युलोकात परतण्याचा तुझा क्षण आला आहे.

नीळकंठ :- (आनंदानं) म्हणजे ते अमृत पिणं टळणार? छान झालं.

चित्रगुप्त :- नीळकंठ, तुझ्या सारख्या पुण्यवानाची काय इच्छा आहे? कुठं जन्म घ्यायचा आहे तुला?

नीळकंठ :- कुठं म्हणजे? भारतातच. आणि होमिओपॅथीच्या डॉक्टरच्याच घरात. खूप संशोधन करायचं आहे मला. लोकाचं खरं कल्याण करायचंय.

चित्रगुप्त :- तथास्तु!
(दूत नीळकंठाला घेऊन जाऊ लागतात. सत्यकामाजवळ जात नीळकंठ 'भाऊजी' असे उद्गारून त्यांच्या पाया पडतो. सत्यकाम गहिवरतो. त्याला पोटाशी धरतो. दोघांच्याही डोळ्यात अश्रू.)

सत्यकाम :- बावा मला तुझा अभिमान वाटतो. (दूर करीत) ये आता.

नीळकंठ :- (गहिवरलेला) येतो भाऊजी. (दुतांबरोबर निघून जातो. थोडा वेळ सारे स्तब्ध. नंतर -)

चित्रगुप्त :- तर वकीला, तुझा हा बार फुसका निघाला बरं का?

वकील :- (खजील) निघाला खरा. पण यापुढचा हा शेवटचा आरोप असा जबरदस्त आहे की त्यावर हा सत्यकाम निरूत्तर झालाच पाहिजे.

चित्रगुप्त :- (उत्सुकतेनं) अस्सं? कोणता?

वकील :- आत्मघाताचा! भावनेच्या भरात केलेला आत्मघात!

चित्रगुप्त :- आत्मघात! आहे खरा जबरदस्त आरोप.

वकील :- महाराज आपणास माहीतच आहे की आत्मघात हे केवढे मोठे पाप आहे.

चित्रगुप्त :- हो. कारण परमेश्वरीयोजनेत ती ढवळाढवळ ठरते. मला वाटते की मृत्यू लोकातही तो गुन्हा ठरविला गेला आहे. कायद्यानं.

वकील :- (विजयी स्वरात) होय महाराज, म्हणूनच ह्याचं हे कृत्य मुळीच समर्थनीय ठरत नाही. आणि परमेश्वरी योजनेत ढवळाढवळ म्हणाल तर ती तर ह्याने केलीच आहे.

चित्रगुप्त :- ती कशी?

वकील :- ती तुम्ही प्रत्यक्षच पहा.

चित्रगुप्त :- पण त्या आधी ह्या सत्यकामाचं म्हणणं तर ऐकून घेऊ. बोल सत्यकामा ह्यावर तुझं काय म्हणणं आहे?

सत्यकाम :- (शांतपणे) मी माझं कर्तव्य केलं. माझ्या कृत्याचं मूल्यमापन करणं तुमचं काम आहे.

चित्रगुप्त :- ठीक आहे. मग आम्ही प्रथम तो प्रसंग पाहतो. (डोळे मिटतात. अंधार)

## प्रवेश ४ था

(ओसरी, संध्याकाळ, सत्यकामाची मुलं छोटू व बाळ. सावित्री, आता वयस्क झालेला दत्तू. सर्व चिंतेत.)

सावित्री :- (चिंतेनं) अजून कॉलेजमधून येणं झालं नाही. रात्र व्हायला आली. ते कॉलेज म्हणजे जसा काही दुसरा संसार झालाय त्यांचा.

दत्तू :- वहिनी, भाऊजींनी स्थापन केलेलं होमिओपॅथीक कॉलेज म्हणजे त्यांना पोटच्या पोरासारखं. त्यांना सर्वांनी प्रिन्सीपाल केलं तर पैसा कमी पडतो म्हणून त्यांनी नाममात्र १ रुपया पगार घ्यायचा ठरवलं. म्हणाले आधी कॉलेज आपल्या पायांवर नीट उभे राहू द्या. मग पाहू. मला तर वाटतं त्यांना गरीबीत राहण्याची सवयच झाली आहे आता.

बाळ :- त्यांचे सर्व सहकारी पण तसेच आहेत काका. सत्‌चिकित्सेचा प्रचार करायचाय त्यांना. स्वार्थत्यागाची सुद्धा एक नशाच असते.

दत्तू :- अरे पण त्याला काही सुमार? काही काळवेळ? आधीच शहर पेटलंय गांधीजींची हत्या झाल्यापासून. त्यात तो नथुराम गोडसे ब्राह्मण निघाला. सर्वजण उठले आहेत ब्राह्मणांच्या जीवावर. घरंदारं, दुकानं लुटताहेत त्यांची. जाळपोळ करताहेत. मारताहेत त्यांना.

छोटू :- अरे एक ब्राह्मण तसा निघाला म्हणून साऱ्यांना शिक्षा? एकानं गाय मारली म्हणून दुसऱ्यानं वासरू मारायचं? हा कोणता

न्याय?

**बाळ** :- जमावाला डोकं नसतं छोटू. त्याचं मानसशास्त्र वेगळंच असतं. चांगले मोठे बुद्धिमान लोक सुद्धा जमावाच्या आहारी गेले की वेड लागल्यासारखे वागतात. आहारी जातात. गर्दीचे मानसशास्त्रच वेगळे असते. त्यात पहिला बळी जातो सत्याचा, तर्काचा व बुद्धीचा. म्हणून आम्ही तीन दिवस कॉलेज बंद ठेवलंय आमचं.

**छोटू** :- तुमचं ठीक आहे हो, पण भाऊजी तयार नव्हते ना कॉलेज बंद ठेवायला. म्हणाले, गरज काय कॉलेज बंद ठेवायची?

**बाळ** :- मी म्हणालो कोणी विद्यार्थी किंवा इतर प्राध्यापक सुद्धा येण्याची शक्यता नाही. तुम्ही जाऊ नका. पण ऐकलं नाही. गेले.

**सावित्री** :- म्हणूनच काळजी वाटते रे बाळा. शहरात जाळपोळ चालू आहे. दंगल माजलीय, तरी बाहेर निघाले हे. मी अडवलं तर म्हणाले - तुमचं घर म्हणजे किल्ला आहे का किल्ला! इथं काही होऊ शकत नाही का? गुंड आपल्या घरावर येणार नाहीत कशावरून? आणि आले तर तुम्ही काय करणार? त्या पितळेशास्त्र्याच्या आणि सनातन्यांच्या दृष्टीनं आपण खरे ब्राह्मण नाहीच. पण लोकांना काय हो! ते झपाटलेय. द्वेषानं अंध झाले आहेत. तेव्हा घाबरून कसं चालेल?

**छोटू** :- हो. पण म्हणून मुद्दाम धोक्यात उडी घ्यायची काही गरज? नसते गेले आज कॉलेजात तर काही बुडत नव्हतं यांचं कॉलेज. पण ऐकतील तर ना -

(इतक्यात काही लोक सत्यकामाला आधार देऊन चालवत आणतात. पोट रक्तानं भरलेले. पोटात बहुधा सुरा खुपसलेला असावा. सत्यकामाचे रक्तानं माखलेले दोन्ही हात पोटावर. सर्वजण सत्यकामाला ओसरीवर आणतात. सत्यकामाच्या चेहऱ्यावर एक विलक्षण आनंद)

**सावित्री** :- (धावून जवळ जात) अहो, काय झालंय तुम्हाला? अपघात झाला की पडले कुठंतरी? किती रक्त वाहतंय? (गर्दीतल्या एकाला) अहो, काय झालंय ह्यांना? (आशंकेनं) कुणी हल्ला

केला का यांच्यावर?

**एक जण** :- आई, काय सांगू? कसं सांगू? .... आई मन घट्ट करून ऐका. दंगेखोरांनी ह्यांच्या पोटावर वार केलेत. सुऱ्यानं!

**सावित्री** :- अरे देवा रे. (असं म्हणून बेशुद्ध पडते. छोटू तिला सावरून आत घेऊन जातो. बाळ व दत्तू सत्यकामाला ओसरीवर असलेल्या खुर्चीत बसवतो. नंतर-)

**बाळ** :- (शोकाकुल) काका, भाऊंना औषध आणून द्या लवकर. आणि थोडं पाणी आणा प्रथम. (दत्तू डोळे पुसत आत जातो) काय झालं असेल ह्याची कल्पना आली मला. तरी मी म्हणत होतो की आजच्या दिवस बाहेर जाऊ नका म्हणून. शहरात दंगा पेटलाय. ब्राह्मणांच्या जीवावर उठले सारे. पण ...

**दुसरा** :- (बाळला) अँब्युलन्स बोलावून आणतो झटकन्. इस्पितळात भरती करावं लागेल. जखमा शिवण्याकरता. रक्त द्यावं लागेल. खूप वाहिलंय. आमच्या डोळ्यांसमोरच घडलंय ना सारं. वाईट, फार वाईट घडतंय. सैतान जागा झाला आहे ना माणसातला. केलं कुणी? भरतंय कोण? (पहिल्याला) चला हो. अँब्युलन्स बोलावून आणू.

**सत्यकाम** :- (त्यांना हातानं इशारा करीत) थांबा. आता काही उपयोग नाही: पोटात फार मोठे वार झालेले आहेत. अँब्युलन्स कोणाकोणासाठी पाठवणार ते? ती येईपर्यंत काही मी राहात नाही. अहो, मला सुखानं मरू द्या. माझी शुद्ध जाण्याच्या आत मला माझ्या लेकांशी बोलायचं आहे. मला औषध आणून द्या. (स्वतःशीच) याच साठी केला होता अट्टाहास -

**पहिला** :- भाऊजी हा तुमचा अट्टाहासच तुम्हाला नडला. (बाळाला) आम्ही किती अडवलं. पण यांनी ऐकलं नाही.

**बाळ** :- (गोंधळून) म्हणजे? मी समजलो नाही.

**दुसरा** :- अहो, आम्ही शेजारच्या घरातून लपून पाहात होतो ना. मारुतीच्या देवळाजवळच्या पितळेशास्त्रीच्या घरावर गुंडाची धाड पडली. लाठ्या, काठ्या सुरे घेऊन. तो भीतीनं घरात दडून बसला

होता.

पहिला :- आमच्या सारखाच. हल्लेखोरांचं लक्ष होतं पितळेशास्त्री! त्याला गुंडानी दार फोडून घराबाहेर ओढून काढलं. तो थरथर कापत गयावया करीत होता. हातापाया पडत होता. नेमकं त्याच वेळेस-

बाळ :- (तोडत) काय झालं त्याच वेळी?

दुसरा :- भाऊजी रस्त्यानं घरीं येत होते. त्यांनी हे पाहिलं आणि ते तीरासारखे त्या गर्दीत शिरले. पितळेशास्त्र्यांना मागे घालून समोर छाती काढून उभे राहिले. त्या अनावर जमावाला ओरडून समजावून सांगू लागले -

पहिला :- "अरे तो एक माथेफिरू निघाला म्हणून साऱ्या ब्राह्मणांवर सूड घेणार काय? हा अन्याय आहे. आणि मी तो माझ्या समोर होऊ देणार नाही. चला व्हा मागे."

दुसरा :- आणि काय सांगू बाळासाहेब. भाऊजींचा तो आवेश पाहून सारा जमाव एकदम स्तब्ध झाला. स्तंभित होऊन भाऊजींकडे पाहात राहिला. ते क्षात्रतेज काही वेगळंच होतं.

पहिला :- त्या तेजानं दिपून जाऊन 'व्हा मागे' म्हणताच जमाव मागे हटला. चूपचाप परतू लागला. तेव्हढ्यात-

दुसरा :- तेव्हढ्यात एक माथेफिरू मुसंडी मारून समोर आला व ह्यांच्या पोटावर वार करून पळून गेला.

पहिला :- त्याचवेळी पोलीसांची गाडी हार्न वाजवीत आली आणि सारा जमाव गल्लीबोळात पळून गेला.

सत्यकाम :- तेव्हढी संधी साधून ह्या लोकांनी मला घरी आणलं. (दत्तू तोंडात औषध टाकतो. पाणी देतो व जवळ बसून मूकरुदन करू लागतो. सारेजण सत्यकामाजवळ जमा होतात. छोटू आणि घरची मंडळी.)

सत्यकाम :- अरे तिच्याकडे बघा कुणी. बेशुद्ध झालीय ती. तिला शुद्धीवर आणा. औषध द्या. दत्तू, छोटू, बाळ रडताय काय असे वेड्यासारखे. अरे, मरण कुणाला चुकलंय काय? आणि ते सुद्धा किती सुंदर! एका निरपराध माणसाला वाचवण्यासाठी माझे

प्राण खर्ची पडलेत. अजून काय हवंय माणसाला?

बाळ :- (रडत) भाऊजी, तुम्ही आम्हाला असे अनाथ करून जाणार?

छोटू :- तुमच्या मागे एकटे जगण्याची कल्पनासुद्धा आम्ही करू शकत नाही. कसं होणार आमचं?

सत्यकाम :- (हसून) वेडा रे वेडा. अरे कुणाचं कुणावाचून अडत नाही या जगात; आणि कोणी अमरपट्टा घेऊन आलं का रे? तुमच्या नशीबानं मी बराच काळ जगलो असं समजा आणि शोक आवरून मला शेवटची मात्रा द्या .. बाळ, एक खंत मात्र वाटते आहे रे.

बाळ व छोटू :- (एकदम) सांगा भाऊजीं, सांगा, आम्ही आपली इच्छा पूर्ण करू.

(दत्तू औषध आणण्यासाठी आत जातो)

(इतक्यात एक मध्यमवयीन इसम तीरासारखा धावत येतो. धोतर, कोट, टोपीत. हाच तो पितळेशास्त्री. एक क्षण भाऊजींकडे नजर टाकतो. आणि मग त्यांच्या पायावर लोळण घेतो. क्षमा करा, क्षमा करा भाऊजी असे बडबडत तोंडात मारून घेतो.)

सत्यकाम :- (त्याला उठण्याची हातानं खूण करीत) उठा पितळेशास्त्री, उठा. अहो असं काय करता? तुमच्याच साठी मी हे केलं असं नाही. तुमच्या जागी कुणीही असता, ब्राह्मण नसता तरी मी हेच केलं असतं. माझं कर्तव्यच होतं ते!

(उचकी लागते. क्षणभर डोळे मिटून शांत होतात. नंतर डोळे उघडून मला) अन्याय सहन होत नाही. कशाचाही! कुणावरचाही!

पितळेशास्त्री :- (पश्चातापानं) आणि म्या पामरानं आयुष्यभर तुमचा विरोध केला. तुम्हाला नास्तिक, धर्मबुडवा, दांभिक ठरवलं. तुमच्या प्रत्येक विचाराचा विरोध केला. कळीकाळासारखा तुमचा रागराग केला. भाऊजी, या पाप्याला खरोखर रौरव नरकात सुद्धा स्थान मिळणार नाही.

सत्यकाम :- (क्षीण हसून) म्हणजे तुमचा अजूनही परलोकावर विश्वास आहे म्हणायचा. हरकत नाही. परलोक असलाच तरी पश्चातापानं सारी पातकं धुवून निघतात असं आपल्या धर्मग्रंथातच आहे.

तेव्हा चिंता करू नका.

**पितळेशास्त्री** :- धन्य आहे तुमची, ऋषिवरा. खरोखर धन्य आहे! अशा स्थितीतही तुम्ही माझा राग धरला नाही. खरोखर मुक्तात्मा आहात तुम्ही.

**सत्यकाम** :- पितळेशास्त्री, अहो माझी स्तुती करून मला उगीचच तुमच्या त्या नरकाचा धनी कशाला करता? उठा आता. (छाती दाबून ठेवत) अरे दत्तू ते शेवटचं औषध आण रे बाबा लवकर. सहन होत नाहीत कळा. त्या औषधानं शांत मरण येतं ... (घुटमळत) अरे पण ही खंत मला का छळते आहे? माझा प्राण का अडकवते आहे देहात?

**पितळेशास्त्री** :- (आवेशानं) खंत? कसली खंत भाऊजी? सांगा मला. मन मोकळं करा आपलं आमच्याजवळ. ह्या पितळेशास्त्र्याच्या जीवात जीव असेपर्यंत मी आपली इच्छा पूर्ण करीन. कुणाचा संभाळ करायचा आहे का आपल्या मागे? सांगा.

**सत्यकाम** :- पाणी ... पाणी (बाळ पाणी देतो ते पिऊन) नाही. माझे ग्रंथ! माझे बरेच ग्रंथ अजून अप्रकाशित आहेत. ते प्रकाशित होऊन लोकांसमोर यायला हवेत. त्यातील विचारांनी मानवजातीचे खरे कल्याण होईल अशी माझी श्रद्धा आहे. (स्तब्ध होतात)

**पितळेशास्त्री** :- (आत्मविश्वासाने) दिले! मी वचन दिले तुम्हाला. तुमच्या मागे मी तुमचे सारे ग्रंथ प्रकाशित करीन. इतकेच नाही तर तुमच्या विचारांचा समाजात प्रसार करीन. भाऊजी मी वचन देतो की या पितळेशास्त्र्यानं तुमच्या विचारांची पताका आजपासून आपल्या खांद्यावर घेतली आहे. (त्यांचा हात हातात घेऊन वचन देतो. सत्यकामाच्या चेहऱ्यावर समाधान. दत्तू औषध सत्यकामाच्या तोंडात टाकतो व पाणी पाजतो.)

**सत्यकाम** :- (पाणी पिऊन) शास्त्रीबोवा, तुम्ही खरोखरच महान आहात. आता संपलं. ग्रंथ आटोपला. आता महानिद्रेची तयारी करावी ... (डोळे मिटतो.)

(सर्वजण एकमेकांकडे पाहात असतांनाच नाडी धरून बसलेला दत्तू एकदम उठतो आणि कोपऱ्यात जाऊन हमसाहमसी रडू

लागतो. आतून माजघरात बायकांच्या रडण्याचा आवाज येऊ लागतो. पितळेशास्त्री एकटक भाऊजींच्या चेहऱ्याकडे काहीवेळ पाहात राहतात. नंतर तोंडानं श्रीराम जयराम जयजय राम असा जप करू लागतात अंधार. शोकरस उत्पन्न करणारे संगीत बराच वेळ वाजत राहते.)

## प्रवेश ५ वा

(चित्रगुप्ताचा पूर्ण दरबार प्रकाशात येतो. आरोपीच्या कठड्यात घोंगडी पांघरलेला सत्यकाम, सारे देव, भारावलेले. वकीलही. शेवटी चित्रगुप्तच शांततेचा भंग करतो.)

चित्रगुप्त :- वा. याला म्हणतात वीर मरण! सत्यकामा, धन्य आहे तुझी, याला आत्मघात कोण म्हणेल?

सत्यकाम :- (हसून) आपले वकील महाशय.

वकील :- महाराज, मी मुद्दाम ह्याला डिवचलं. तुम्ही हा एवढा उदात्त, अपूर्व मरणसोहळा आपल्या अंतःचक्षूंनी पहावा म्हणून.

चित्रगुप्त :- म्हणजे आतापर्यंत तू जे काही केलंस -

वकील (तोडत):- तो एक व्यवसाय म्हणून. आपल्या न्यायालयात विरुद्ध बाजूही लढवावी लागते. ते माझ्यावर सोपवलेलं काम मी करीत होतो इतकंच -

चित्रगुप्त :- म्हणजे मनातून तुला पटलं होतं की -

वकील :- (तोडत) हे सर्व आरोप चूक आहेत. हा सत्यकाम एक महामानव आहे महाराज. शंकाच नको.

चित्रगुप्त :- (वकीलास) मग आता तुझे काय मत आहे? ह्याला कोणता लोक द्यावा. स्वर्गलोक की ब्रह्मलोक?

वकील :- (आदरानं) महाराज, माझ्या मते ह्या, सत्याची आयुष्यभर उपासना करणाऱ्या, कलियुगातील ऋषितुल्य महात्म्याला ब्रह्मलोकच द्यावा. जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्ती मिळण्यासाठी.

चित्रगुप्त :- बरोबर. बरोबर माझ्या मनातलं बोललास. तेव्हा निवाडा झाला. मी सत्यकामाला ब्रह्मलोकी पाठवीत आहे.

सत्यकाम :- महाराज, एक विनंती आहे. तिचा विचार व्हावा.

**चित्रगुप्त** :- बोल सत्यकामा, तुला अभय आहे.

**सत्यकाम** :- महाराज, आपल्याला माहीतच आहे की द्वैत बुद्धीमुळे माणसामाणसात, राष्ट्राराष्ट्रात स्वार्थापायी आणि खोट्या अभिमानापायी विनाशकारी चढाओढ सुरू असून विज्ञानाच्या दुरुपयोगाने मानव आज भयंकर विनाशाकडे ओढल्या जात आहे. अशा परिस्थितीत मला ब्रह्मलोकी सुख कसे लाभणार?

**चित्रगुप्त** :- सत्यकामा, त्याला तू काय करणार? जे विधिलिखित मानवाच्या समोर असेल ते टळणार थोडेच. आणि तुझा मानवाशी संबंधच काय उरला? तू सुखाने ब्रह्मलोकी जा.

**सत्यकाम** :- नाही महाराज. असं म्हणून मी स्वस्थ बसूच शकत नाही. मला परत मृत्युलोकात जायलाच हवं. मानवाला खरा मानवधर्म शिकवून शहाणं करून सोडल्याशिवाय हा त्याचा विनाश टळणार नाही. मग त्यासाठी मला एकच काय अनेक जन्म घ्यावे लागले तरी हरकत नाही. मला मुक्त होण्याचा अधिकारच नाही. महाराज, माझी एवढी विनंती मान्य कराच. आजवर मी कुणापुढेही कधीही हात पसरला नाही. पण आता पसरतो. (हात जोडतो)

**चित्रगुप्त** :- (सद्‌गदीत होऊन) धन्य! धन्य आहेस तू सत्यकामा. मानवाच्या - मानवतेच्या अंतिम कल्याणासाठी तू ब्रह्मपद नाकारलेस. मुक्ती नाकारलीस. खरोखर तू अलौकिक आहेस. मी तुला ब्रह्मर्षी म्हणून पदवी देतो.

**सत्यकाम** :- (तोडत) त्या पदवीचा मला काय उपयोग?

**चित्रगुप्त** :- (हसत) अरे पुढं ऐक तर. मी तुझी विनंती एक अपवाद म्हणून मान्य करीत आहे. तुला तुझ्या योग्य जे कूळ वाटत असेल तिथे परत जन्म घेण्यास तू मोकळा आहेस. पण -

**सत्यकाम** :- आता पण काय महाराज. मला घाई झाली आहे माझ्या भारत देशात जाण्याची. तिथूनच साऱ्या मानवाचे खरे कल्याण करण्याचा प्रचार मला करता येईल.

**चित्रगुप्त** :- अरे किती अधीर होतोस. थांब पळभर. वकीला, ह्याला अटी सांग.

**वकील** :- (आदरानं) ब्रह्मर्षी सत्यकाम महाराज, आपण परत जन्म घेताहात. पण आता इथं जे काय घडलं त्याची किंवा मागच्या जन्माची आठवण तुम्हाला राहणार नाही. स्वभाव किंवा संस्कार तुमच्याबरोबर राहतील. जन्मतःच. हा ईश्वरी नियम आहे. तो तोडण्याचा आम्हालाच काय पण कोणत्याही परम शक्तीला अधिकार नाही. तेव्हा -

**सत्यकाम** :- ईश्वरी नियमानुसार होणाऱ्या सर्व घटना मला नेहमीच मान्य होत्या. आजही आहेत. ईश्वरी नियमांचे पालन करण्यात मानवाचे अंतिम कल्याण आहे हेच माझं म्हणणं होतं आणि आहे. तेव्हा माझी विनंती मान्य करून मला आता आज्ञा द्या महाराज. उशीर होतोय.

**चित्रगुप्त** :- (हात वर करून) तथास्तु!

(चित्रगुप्त उठतो आणि निघून जातो. वकील व सर्व प्रेक्षक देव सत्यकामाला एक एक करून आलिंगन देत असतात. बाहेर "ब्रह्मर्षी सत्यकामाचा विजय असो" अशा घोषणा ऐकू येतात. त्या विरल्यावर गंभीर सुरात पसायदानाचे सहगान सुरू होते. ते चालू असतांनाच पडदा सरकायला सुरुवात होते.)

**(पडदा)**



श्री. विजय गणपतराव वाटाणे
(जन्म : १८ मार्च १९३४ नागपूर)
व्यवसाय : निवृत्त लेखाधिकारी महालेखाकार, नागपूर.

श्री. विजय वाटाणे हे विद्वत्‌रत्न के.ल. उपाख्य भाऊजी दप्तरी याचे नातू. नागपूर विद्यापीठाचे पदवीधारक (कलाशाखा). भाऊजींच्या सान्निध्यात त्यांना साहित्याची गोडी लागली: बालपणापासूनच आजोबांच्या सहवासात राहिल्यामुळे भाऊजींच्या विवेकवादी विचारसरणीचा प्रभाव त्यांच्यावर पडला असून तिचे प्रतिबिंब त्यांच्या सर्व साहित्यावर पडलेले आढळते. त्यांनी आपली साहित्यसेवा प्रथम काव्यरचनेने सुरू केली. पण कालांतराने त्यांनी कथालेखनात तसेच नाट्यलेखनातही रस घेतला. त्यांच्या कविता व कथा महाराष्ट्रातील विविध नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या आहेत. 'सप्तरंग' या विदर्भ प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या सात वैदर्भीय कवींच्या प्रातिनिधिक काव्यसंग्रहात त्यांच्या कवितांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. 'चक्रांकित' (प्रकाशन : ललित कला भारती) व 'स्वरसम्राट' (प्रकाशन : प्रभा प्रकाशन) असे त्यांचे दोन कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांना संगीत व रंगभूमी या विषयातही गोडी असून एक हौशी अभिनयपटू नट व नाट्यदिग्दर्शक म्हणून त्यांनी अनेक एकांकिका व नाटकं लिहिली आहेत. त्यापैकी ''वशाचे वशीकरण'' हे फार्सवजा विनोदी नाटक प्रभा प्रकाशनने पुस्तक रूपाने प्रसिद्ध केले आहे. त्यांना राज्यनाट्य महोत्सवात दिग्दर्शनाचे पारितोषिकही मिळाले आहे. ''ब्रह्मर्षी सत्यकाम'' हे त्यांचे दुसरे उल्लेखनीय नाटक.